पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २५५ ■ बुधवार, दि. २५ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com






## पंकजभाऊंची ....
## सामाजिक व्यवसायिकता न्यारी, 'आरआरसी' ला दिली नवी उभारी..!

गेल्या काही वर्षांत सर्वसामान्य नागरिकांसह सर्वच क्षेत्रात वाढलेली महागाई, तरुणाईंपुढे आलेली बेरोजगारी त्याचप्रमाणे जगावर आलेले कोरोना सारख्या महामारीचे व युद्धाचे संकट आदी संकटे दिवसेंदिवस वाढतच आहेत. अशा संकटांवर मात करून नवी वाट शोधत यशोशिखर गाठण्यासाठी कौशल्य, प्रगाढ इच्छाशक्ती, ध्येय, उद्दिष्ट, संयम, जिद्द, कर्तव्य, कर्तृत्व आणि कणखर नेतृत्व हे सर्वगुण संपन्न असलेले उद्योजक क्षेत्रात यशस्वी वाटचाल करणारे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आदरणीय पंकज प्रदीप देशमुख यांची आजच्या काळात यशोशिखर गाठण्यासाठी धडपड सुरू आहे.

युवा विश्वाला नवी दिशा देणारे आणि प्रेरणादायी असलेले युवा उद्योजक पंकज देशमुख यांचा यशस्वी व्यावसायिक प्रवास थक्क करणारा आहे. क्षेत्र कोणतेही असो, संकटे कितीही असोत दमदार नेतृत्व असेल तर यश नक्कीच मिळते. काही तरी नवीन करण्याची क्षमता अंगी असेललं नेतृत्व अवकाशाला गवसणी घालण्याची क्षमता नक्कीच ठेवते. परिस्थिती कशीही असो, संकटे कितीही असोत, आव्हाने कितीही असोत, असेल स्वप्न जर उराशी तर जगही बदलता येवू शकतं, हे वास्तव पंकज देशमुख यांनी आपल्या कर्तृत्वातून जगा समोर मांडले आहे. आरआरसी नेटवर्कचे कार्यकारी संचालक म्हणून ते मोठी जबाबदारी यशस्वीपणे सांभाळत आहेत. प्रचंड मेहनत करून त्यांनी 'आरआरसी' ला नवी उभारी दिली आहे.

आदरणीय प्रदीप उर्फ बंडूभाऊ देशमुख यांनी लावलेल्या आर आरसी नेटवर्कच्या छोट्याशा वृक्षाचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. त्यांचा वारसा पुढे नेण्यासाठी पंकज देशमुख हे मोलाची साथ देत आहेत. त्यांच्या नेतृत्वात आरआरसी नेटवर्कच्या माध्यमातून श्री राजराजेश्वर कंट्रक्शन, श्री राजराजेश्वर कम्युनिकेशन, श्री राजराजेश्वर कम्युनिकेशन प्रायव्हेट लिमिटेड, श्री राजराजेश्वर स्टोनक्रशर, श्री राजराजेश्वर प्रोडक्शन आदी व्यवसायांमध्ये प्रगतीचे एकेक पाऊल चढत यशस्वी वाटचाल सुरू आहे. सोबतच सिटी चॅनल व पश्चिम विदर्भातील वाचकांच्या पसंतीचे अग्रणी सायं. दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट या मीडिया हाऊसच्या माध्यमातून समाजातील अन्याय अत्याचारावर आसूड ओढत सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्याचे व समाजाला नवी दिशा देण्याचे काम अविरत सुरू आहे. तसेच विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी शाळेच्या माध्यमातून शैक्षणिक कार्य सुध्दा अविरत सुरू आहे. आरआरसी नेटवर्कचे कार्यकारी संचालक म्हणून पंकज देशमुख हे प्रचंड मेहनत घेऊन व्यवसाय वाढीसाठी नेहमीच प्रयत्नशील असतात.

जगविख्यात लंडन सारख्या शहरात उच्च शिक्षण घेतल्यानंतरही मोठ्या पगाराची नोकरी न करता वडिलांचा वारसा पुढे चालवण्याचा वसा त्यांनी हाती घेतला आहे. जेमतेम पाच-सहा वर्षापूर्वी आरआरसी नेटवर्कचा संपूर्ण कारभार पंकज देशमुख यांनी हाती घेतला आणि अवघ्या काही वर्षात त्यांनी प्रचंड मेहनत आणि कर्तृत्वाच्या जोरावर आरआरसी नेटवर्कच्या माध्यमातून व्यवसायात भरभराट केली असून एक यशस्वी युवा उद्योजक म्हणून उद्योग विश्वात आपल्या नावाचा दबदबा कायम ठेवला आहे. त्यांच्यात व्यवसाय कौशल्य आणि कर्तव्य, कर्तृत्वाचे आणि यशामागचे हेच खरे गमक आहे. आरआरसी नेटवर्कचे कार्यकारी संचालक म्हणून त्यांनी धुरा हाती घेतली आणि यशाचे एक एक टप्पे गाठत त्यांनी आज आरआरसी नेटवर्कला पश्चिम विदर्भात अग्रणी स्थानावर नेवून ठेवले आहे. आज २५ मार्च हा त्यांचा वाढदिवस. आज त्यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. इतक्या कमी वयात त्यांनी जे यश संपादन केले आहे त्याचा आरआरसी परिवाराला सार्थ अभिमान आहे. आरआरसी नेटवर्कचे व्यवस्थापक, मालक बंडूभाऊ देशमुख आरआरसी नेटवर्क परिवाराचे आधारवड. परिवारातील सर्वांसाठीच पितृतुल्य. त्यांचा एक एक शब्द परिवारातील प्रत्येक सदस्यासाठी लाखमोलाचा. त्यांनी लावलेल्या छोट्याशा रोपट्याचे कार्यकारी संचालक पंकज देशमुख यांच्या नेतृत्वात आज वटवृक्षांत रूपांतर झालेले आहे. त्यांच्या नेतृत्वात आता पश्चिम विदर्भातच नव्हे तर महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातही आरआरसी नेटवर्कची यशस्वी वाटचाल सुरू आहे. पंकज देशमुख यांच्या रूपाने एक उदयोन्मुख व दमदार नेतृत्व आरआरसी नेटवर्कला लाभले आहे. यशस्वी युवा उद्योजक म्हणून पंकज देशमुख यांचे नाव पुढे येत आहे. त्यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनात आरआरसी नेटवर्कमध्ये नवनवीन तंत्रज्ञान येत आहे. प्रशिक्षित व उच्चशिक्षित कुशल कर्मचारी वर्गाची साथ त्यांना मिळत आहे. यामुळे आरआरसी नेटवर्कची यशस्वी वाटचाल अती वेगाने सुरू आहे. विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजसेवेचे कार्य देखील आरआरसी नेटवर्कच्या माध्यमातून केले जात आहे. आई-वडीलांचा सामाजिक कार्याचा वसा घेवून यशाच्या नवनवीन वाटा शोधत अवकाशाला गवसणी घालण्यासाठी कार्यकारी संचालक पंकज देशमुख यांची धडपड सुरू आहे. त्यांची धडपड नक्कीच भरभराट करणार यामध्ये कुठल्याही प्रकारची शंका नाही. त्यांना मिळालेला समाजसेवेचा वारसा हा असाच दिवसेंदिवस वाढत जावो याच जन्मदिनी सदिच्छा..!



आतिश देशमुख
संपादक, वाशिम

# अशोक खरातवर खैरात ?
## पर्यटन खात्याचा 105 कोटींचा निधी मंदिरासाठी

प्रतिनिधी २५ मार्च

**पुणे:** नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरातने ज्या ठिकाणी विकृतीचा कळस गाठला, त्याचं बांधकाम हे सरकारी खर्चातून झालं असल्याचं समोर आलं आहे. धक्कादायक म्हणजे पर्यटनाचा निधी मंदिरासाठी दिल्याचा आरोप करत खरात सरकार पुरस्कृत बाबा आहे. असा दावा आरटीआय ?क्टिव्हिस्ट विजय कुंभारांनी केला आहे. नाशिकच्या मिरगावमधील श्री सिद्धेश्वर इशानेश्वर देवस्थानला १०५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पर्यटन विभागाने ३१ मार्च २०१८ ला हा निर्णय घेतला आणि त्या वर्षी २५ लाखांचा निधी देण्यात ही आला. हे काम मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाने करायचं असं त्यात नमूद आहे, असा दावा करत कुंभारांनी



पुरावे सादर केले आहेत. म्हणजे ज्या ठिकाणी महिला आणि अल्पवयीन मुलींचं शोषण झालं, त्यासाठी सरकारने निधी पुरवला आहे, असा आरोप करत सरकार खरातवर कशी खैरात करत होतं, हे कुंभारांनी पुराव्यानिशी मांडण्याचा प्रयत्न केला.

विजय कुंभार म्हणाले की, मी कालपासून म्हणतोय, हा बाबा सरकार पुरस्कृत बाबा आहे का अशी मला शंका येत आहे. त्याची कारणंही वेगळी आहेत, गेली २५ वर्षे त्या बाबाला अनेकांनी सहकार्य केलं आहे. अनेक मंत्री अधिकारी असतील ते मदत करत होते, पण आता जी माहिती पुढे येत आहे, ती पाहता सरकारनेच या गुन्ह्याला पाठिशी घातलं, या गुन्ह्यांना पाठिशी घातलं, असं म्हणता येईल, ३१ मार्च २०१८ मध्ये प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतून जिल्हा स्तरीय कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. ही मंजुरी पर्यटनस्थळांना मिळते, त्यावेळी कोण मंत्री होतं ते मला आत्ता पटकन सांगता येणार नाहीये, आताच ही माहिती मला मिळालेली आहे.

एक विषय आहे, पर्यटनासाठीचा निधी हा ईशान्येश्वर मंदिराच्या बांधकामासाठी वापरला आहे, अशोक खरातच्या मंदीरासाठी हा निधी वापरला आहे. नाशिक येथील श्री सिद्धेश्वर ईशान्येश्वर देवस्थान मिरगाव तालुका सिन्नर येथील विकास कामांना त्या काळात १०५ कोटी रुपये निधी मंजूर झाला, त्यापैकी २५ लाख देण्यात आले होते, त्यामध्ये या मंदिराचा बांधकाम करण्यात आला आहे, हा सर्व सरकारी कारभार आहे खाजगी नाही, त्या ईशान्येश्वर मंदिरात सभामंडप बांधकाम ३६ लाख रुपये, महिला पुरुष प्रसाधनगृह सात लाख ५२ हजार, चेंजिंग रूम तेरा लाख छत्तीस हजार रुपये, शासनाने बनवून दिली, वाहनतळ ६८ लाख, भक्तनिवास बारा लाख ५३ हजार, लँडस्केपिंग आणि गार्डनिंग चार लाख ३८ हजार, जीएसटी वगैरे वगैरे, ज्या बाबांनी जिथे गुन्ह्यांची सुरुवात केली, ज्या बाबाने गुन्ह्यासाठी मंदिर बांधली, त्या बाबाच्या मंदिराचं बांधकाम सरकारच्या पैशातून झालं आहे,

# सिलिंडर वितरणाचा कोणताही नवीन नियम नाही

प्रतिनिधी २५ मार्च

**मुंबई :** एलपीजी सिलेंडर बुकिंगबाबत पसरत असलेल्या नवीन अफवा खोट्या असल्याचे सरकारने आता स्पष्ट केले आहे. काही बातम्या आणि सोशल मीडियावरील पोस्ट्समध्ये असे सुचवण्यात आले होते की, गॅस सिलेंडर बुक करण्यासाठी वेगवेगळ्या लोकांना वेगवेगळ्या कालावधीसाठी प्रतीक्षा करावी लागेल. मात्र, सरकारने म्हटले आहे की, असा कोणताही नवीन नियम लागू करण्यात आलेला नाही.



सरकारच्या म्हणण्यानुसार, तेच जुने नियम अजूनही लागू आहेत. शहरी रहिवाशांसाठी बुकिंगची अंतिम मुदत २५ दिवस आहे, तर ग्रामीण रहिवाशांसाठी ती ४५ दिवस आहे. हा नियम सर्वांना समान लागू होतो; यात कोणतीही वेगळी प्रवर्गे नाहीत.सरकारने लोकांना अशा खोट्या बातम्यांवर विश्वास न ठेवण्याचे किंवा त्या न पसरवण्याचे आवाहन केले आहे. सरकारने असेही म्हटले आहे की देशात गॅसची कोणतीही कमतरता नाही आणि सर्वांसाठी पुरेसा एलपीजी उपलब्ध आहे, त्यामुळे घाबरण्याची किंवा बुकिंगसाठी घाई करण्याची गरज नाही. जर कोणी ठरलेल्या वेळेपूर्वी गॅस बुक करण्याचा प्रयत्न केल्यास, सिस्टीम ते बुकिंग आपोआप ब्लॉक करेल. ही वेळ मागील गॅस डिलिव्हरीच्या तारखेपासून मोजली जाईल. हा नियम शहरे, गावे आणि दुर्गम भागांसह सर्व ठिकाणी लागू असल्याचे म्हटले जाते.

# एन सी पी वर ताबा मिळवण्यासाठी ब्लॅक मॅजिक
## दादांच्या अपघातामागे घातपाताचा संशय !

प्रतिनिधी २५ मार्च

**मुंबई:** राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी विधिमंडळ परिसरात पत्रकार परिषद घेत प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. पटेल आणि तटकरे यांना पक्षावर ताबा मिळवायचा होता, तसेच हा सगळा कट रचला गेला असल्याचा गंभीर आरोप रोहित पवारांनी केला आहे.विधिमंडळ परिसरात रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी बोलताना ते म्हणाले, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे तसेच ब्रिजमोहन श्रीवास्तव आणि आणखी एका व्यक्तीच्या सह्या आहेत. या सह्या कशावर त्यांनी केल्या आहेत, एकतर त्यांनी खोटे सांगितले की त्यांचे कॉंस्टिट्युशन जे आहे, प्रत्येक पक्षाचे एक कॉंस्टिट्युशन असते. हे बदलण्यात आले आहे. त्यात जे कार्याध्यक्ष असतील त्यांना पक्षाचे पूर्ण अधिकार दिले जातील.

पुढे रोहित पवार म्हणाले, म्हणजे अजितदादांना जाऊन फक्त १८ दिवस झाले होते आणि १६ फेब्रुवारी रोजी हे पत्र सुनेत्रा काकींना न सांगता, पार्थ पवारला न सांगता, बाकी आमदारांना विश्वासात न घेता हे पत्र इलेक्शन कमिशनला देण्यात आले. विशेषतः प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांनी अजितदादांची ताकद आणि पक्षाचे पूर्ण अधिकार प्रफुल्ल पटेल यांना दिले गेले. जे सुनेत्रा काकींना कळले असणार आणि त्यांनी लगेच पत्रव्यवहार केला. आता यात बघा अजितदादा जीवंत असताना त्यांच्या घराबाहेर ब्लॅक मॅजिक केले जाते. कदाचित नाशिकचाच जो भोंदूबाबा आहे तिथे काळी जादू करण्याचा प्रयत्न होतो. याच्यामागे कारण म्हणजे पक्षावर ताबा मिळावा असे होते का? त्यानंतर २८ तारखेला दुर्दैवी अजितदादांचा अपघात झाला की घातपात झाला हे आम्ही शोधत आहोतच.




# गॅस बुकिंगसाठी ३० तर मिळण्यासाठी २० दिवसांची प्रतीक्षा!
## नागरिक वैतागले, एजन्सीबाहेर नागरिकांच्या रांगा

प्रतिनिधी २५ मार्च

**अकोला :** घरगुती गॅस सिलिंडरसाठी नियमानुसार बुकिंग करूनही वेळेत गॅस मिळत नसल्याने शहरातील नागरिक वैतागले आहेत. शहरातील बहुतांश गॅस एजन्सीवर ती उघडण्याच्या आधीपासूनच नागरिक गॅस सिलिंडर मिळण्यासाठी रांगा लावून बसत आहेत. ३० दिवसांनंतर बुकिंग केल्यानंतरही २०-२० दिवस गॅस मिळण्याची नुसती प्रतीक्षाच करावी लागत असल्याने नागरिकांचा संयम सुटत असल्याने किरकोळ वादाच्या घटनाही घडत आहेत.

३० दिवसानंतर गॅस बुकिंग करून, त्यानंतर २० दिवस उलटल्यानंतरही नागरिकांना गॅस मिळत नाही. शहरातील अनेक भागातील नागरिक यामुळे त्रस्त झाले आहेत. दोन दिवसांपूर्वीच सदगुरू एजन्सीवर वादाची घटना घडली आहे. तसेच रतनलाल प्लाट चौकातील एका एजन्सीवरही सकाळपासूनच नागरिक सिलिंडरसाठी रांगा लावून बसल्याचे चित्र दिवसेंदिवस गडद होत आहे. यापेक्षाही ग्रामीण भागातील परिस्थिती भयावह आहे. तेथे एजन्सीच्या गाड्याच आता येत नसल्याने त्यांच्यासमोर मोठे संकट निर्माण झाले आहे. पुरवठा विभाग कितीही सांगत असला तरी वास्तव परिस्थिती भीषण बनली आहे. गॅस एजन्सीच्या निष्काळजीपणाचा फटका नागरिकांना बसत आहे. गॅस एजन्सीकडून साठेबाजी; तसेच काळाबाजार केल्यानेच नागरिकांना गॅस सिलिंडर मिळत नसल्याचा आरोप आता नागरिकांकडून केला

### गॅस सिलिंडर मिळणेबाबत शाश्वतीच नाही

गॅस बुकिंगसाठी सुमारे ३० दिवसांची प्रतीक्षा करावी लागत आहे. मात्र, बुकिंग झाल्यानंतरही सिलिंडर कधी मिळणार याबाबत कोणतीही स्पष्टता दिली जात नाही. अनेक नागरिकांनी बुकिंग करून १५ ते १८ दिवस उलटूनही गॅस मिळालेला नाही. त्यामुळे त्यांच्यासमोर मोठे संकट निर्माण झाले आहे.

### आमच्या हक्काचे सिलिंडर इतरांना देत असल्याचा आरोप

जर बुकिंग केल्यानंतरही २० दिवसांनी सिलिंडर मिळत नाही. त्यामुळे आमच्या हक्काचे सिलिंडर इतरांना दिले जात असावे, असा आरोप अनेक नागरिकांनी केला आहे. अन्यथा जिल्हा पुरवठा अधिकारी जिल्ह्यात गॅस सिलिंडरचा साठा पुरेसा असल्याचे सांगत असतानाही आम्हाला सिलिंडर का मिळत नाही, असा सवालही नागरिक करीत आहेत. निदान बुकिंग केलेल्यांना प्राधान्यक्रमानुसार सिलिंडर मिळण्याची सुविधा जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी करावी, अशी मागणीही नागरिकांकडून होत आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
बुधवार, दि. २५ मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# अमरावती महानगरपालिकेत 2026-2027 अर्थसंकल्पावर स्थायी समितीची बैठक...

प्रतिनिधी २५ मार्च

**अमरावती :** अमरावती महानगरपालिकेच्या प्रशासनाने सादर केलेल्या सन २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी मंगळवार, दिनांक २४ मार्च २०२६ रोजी स्व. सुदामकाका देशमुख सभागृह येथे स्थायी समितीची सविस्तर बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर होते.

बैठकीदरम्यान आगामी आर्थिक वर्षासाठी प्रस्तावित बजेटमधील विविध तरतुदींवर सखोल चर्चा करण्यात आली. प्रारंभी सभापती अविनाश मार्डीकर यांनी बजेटमधील प्रत्येक विषयाचा बारकाईने आढावा घेऊन



नागरिकांच्या अपेक्षांनुसार आणि शहराच्या गरजांनुसार अर्थसंकल्प अधिक परिणामकारक करण्याचे आवाहन केले.

बैठकीत नगरसेवक व अधिकाऱ्यांनी शहरातील विविध विभागांच्या गरजा, निधीचे संतुलन तसेच नागरिकांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या विकासकामांच्या प्राधान्यक्रमावर चर्चा केली. स्वच्छता व्यवस्था, रस्ते व पायाभूत सुविधा, महानगरपालिका शाळा, आरोग्य केंद्रे तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या सुधारण्यासाठी निधी वाढविण्याबाबत अनेक महत्त्वपूर्ण सूचना मांडण्यात आल्या. बैठकीत प्राप्त सूचनांच्या आधारे संबंधित अधिकारी अर्थसंकल्पात आवश्यक सुधारणा करणार असून सुधारित अर्थसंकल्प पुढील आमसभेच्या बैठकीत मंजुरीसाठी सादर करण्यात येणार आहे. यामुळे महानगरपालिकेचा अर्थसंकल्प अधिक पारदर्शक, नागरिकाभिमुख आणि कार्यक्षम होईल, असा विश्वास समिती सदस्यांनी व्यक्त केला. सन २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पामध्ये शहर विकास, पायाभूत सुविधा बळकटीकरण, आरोग्य व शिक्षण क्षेत्रातील सुधारणा यांसह विविध महत्त्वपूर्ण प्रकल्पांचा समावेश करण्यात आला असून बैठकीत मांडलेल्या सूचना नागरिकांसाठी लाभदायी ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. या बैठकीस नगरसेवक प्रशांत वानखडे, मिलींद बांबल, विनोद तनवाईस, प्रशांत महल्ले, दिपक साहू, सल्लाउद्दीन इक्राममुद्दीन, नाझीम खान करीम खान, नगरसेविका पद्मजा कौंडण?य, पंचफुला चव्हाण, मंजुषा जाधव, स्मिता सूर्यवंशी, ललिता रतावा, अस्मा फिरोज खान, प्रियंका पाटणे, मीनल सवाई, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, मुख्य लेखापरीक्षक श्यामसुंदर देव, मुख्य लेखाधिकारी दत्तात्रय फिस्के तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# ग्राहकांनी हक्कांबाबत सजगता बाळगावी....




प्रतिनिधी २५ मार्च

**अमरावती:** देशात ग्राहकांचे हित जोपाण्यासाठी कायदे अस्तित्वात आहेत. मात्र याबाबत ग्राहकांमध्ये जागरूकता दिसून येत नाही. त्यामुळे ग्राहकांनी आपल्या हक्कांबाबत सजगता बाळगावी, असे आवाहन अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दानेज यांनी केले.

जिल्हा पुरवठा कार्यालयातर्फे आज बचत भवन येथे जागतिक ग्राहक हक्क दिन साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे, अन्न व औषधचे सहायक आयुक्त विनायक चव्हाण, वजन व मापे विभागाचे रिठे, अखिल भारतीय ग्राहक पंचायत संघटन मंत्री डॉ. अजय गाडे, अखिल भारतीय ग्राहक मंचचे जिल्हाध्यक्ष अशोक हांडे उपस्थित होते.

श्री. दानेज यांनी ग्राहकांना चांगल्या सेवा आणि वस्तू मिळाव्यात यासाठी कायदा तयार करण्यात आला आहे. तसेच दाद मागण्यासाठी जिल्हा ते राष्ट्रीय स्तरापर्यंत व्यवस्था उभारण्यात आली आहे. ग्राहकांचे हक्क अबाधित राहण्यासाठी ही तक्रार निवारणाची सोय करण्यात आली आहे. यासोबतच होलमार्क, आयएसआय मार्क यासारख्या गुणवत्ता राखण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या आहे. ग्राहकांची फसवणूक झाल्यास त्याला पुरावे सादर करावे लागतात. यात संबंधित वस्तूचे देयक हे महत्वाचे असते. बियाणांमध्ये फसवणूक झाल्यास बियाणांची पिशवी आणि त्यातील थोडे बियाणे राखून ठेवणे आवश्यक आहे. यातून त्या बियाणांची उगवण क्षमता तपासता येते. ग्राहकांच्या हक्कांविषयी चळवळ उभी राहिली आहे. त्यामुळे ग्राहकांना चांगल्या दर्जाच्या सेवा आणि वस्तू मिळण्यास मदत होत आहे. यावेळी शिवांश मल्टीपर्पज फाउंडेशनतर्फे ग्राहकांच्या हक्क आणि सुविधांविषयी पथपाट्य सादर केले.

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत विदर्भातील पहिले ३३ केव्ही उपकेंद्र कार्यान्वित

प्रतिनिधी २५ मार्च

**अमरावती:** राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत पुसद तालुक्यातील जाम बाजार येथे विदर्भातील पहिले ३३ केव्ही उपकेंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे. या उपकेंद्रामुळे परिसरातील शेतकऱ्यांना दिवसा खात्रीशीर वीज पुरवठ्याची सोय झाली आहे. यावेळी अधीक्षक अभियंता दीपाली माडेलवार, कार्यकारी अभियंता जनार्धन चव्हाण, शशांक पोंक्षे, उपकार्यकारी अभियंता सुहास मेश्राम, प्रविण गवळी यांची उपस्थिती होती. शेतकऱ्यांची दिवसा विजेची मागणी पूर्ण करण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना राबविण्यात येत असून, महावितरणच्या ३३ केव्ही उपकेंद्राभोवती विकेंद्रीत स्वरूपात सौर प्रकल्प उभारून वीज निर्मिती केली जात आहे. तसेच काही भागात नवीन ३३ केव्ही उपकेंद्रांची उभारणीही करण्यात येत आहे. मुख्य अभियंता अशोक साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अधीक्षक अभियंते प्रविण दरोली, दिपक देवहाते व दीपाली माडेलवार यांच्या पुढाकाराने परिमंडळात या योजनेला गती देण्यात आली आहे.

## अमरावतीत गॅस व इंधन टंचाई; आ.रवी राणा यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे तातडीच्या उपाययोजनांची मागणी

प्रतिनिधी २५ मार्च

**अमरावती:** शहरात गॅस सिलेंडर तसेच पेट्रोल-डिझेल पुरवठ्यात निर्माण झालेल्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर तातडीने उपाययोजना राबविण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत आमदार रवी राणा यांनी जिल्हाधिकारी . आशिष येरेकर तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. लांडे, अमरावती यांना निवेदन सादर केले आहे.

सदर निवेदनानुसार, मागील दोन दिवसांत शहरातील विविध भागांचा पाहणी दौरा करण्यात आला असता गॅस व इंधन पुरवठा व्यवस्थेत गंभीर त्रुटी आढळून आल्या. गॅस सिलेंडर मिळविण्यासाठी महिलांना लहान मुलांसह दीर्घ रांगेत उभे राहावे लागत असून, उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तसेच वितरण व्यवस्थेत असमतोल व नियोजनाचा अभाव जाणवत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. पेट्रोल पंपांवर मोठ्या प्रमाणावर वाहनांच्या रांगा लागत असून, इंधन भरण्याच्या वेळी ग्राहकांमध्ये वाद व गोंधळ निर्माण होत असल्याचे निरीक्षणात आले आहे. यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही निवेदनात म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर गॅस सिलेंडर वितरणासाठी अतिरिक्त केंद्रे सुरू करणे, वितरणाचे वेळापत्रक निश्चित करून नागरिकांना पूर्वकल्पना देणे, महिला, ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांसाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच पुरवठा साखळी मजबूत करण्यासाठी संबंधित वितरकांशी समन्वय साधणे, अशा उपाययोजना तातडीने राबविण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच पेट्रोल पंपांवर शिस्तबद्ध रांग व्यवस्थेसाठी पोलीस बंदोबस्त ठेवण्याबरोबरच इंधन पुरवठा नियमित ठेवण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. वरील उपाययोजनांची अंमलबजावणी करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल लवकरात लवकर सादर करण्यात यावा, असे निर्देश आमदार रवी राणा, अध्यक्ष विधानसभा आश्वासन समिती, विधानभवन यांनी दिले असून, अधिक समन्वयासाठी त्यांचे खाजगी सचिव उमेश ढोणे मोबाईल ९०४९०६७३३१ वर यांच्याशी संपर्क साधण्याचेही नमूद करण्यात आले आहे.

## श्री. राम जन्मोत्सवानिमित्त जय भवानी महिला भजनी मंडळाने सादर केले भजन

प्रतिनिधी २५ मार्च

**दर्यापूर :** येथील अतिप्राचीन श्री. शिव दत्त राम मंदिर मध्ये गुढी पाडव्या पासुन श्री. रामनवमी जन्मोत्सव सुरू झाला असून ह्या दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते ह्याचाच एक भाग म्हणून दि २४ मार्च रोज मंगळवारला दुपारी चार वाजता पासुन सहा वाजेपर्यंत जय भवानी महिला भजनी मंडळ भवानी वेस दर्यापूर यांनी विविध भाव भक्तिने ओतप्रोत सुमधुर आवाजात भजने सादर केलित.या मध्ये सुमनताई होले, शोभाताई ठाकुर, अयोध्याताई इंगळे, सुरेखाताई राईकवार, नर्मदाताई पोटे, सुनंदाताई मरकाम, अर्चनाताई इंगळे, नानीबाई पोटे, निर्मलाताई गावंडे, पुष्पाताई बानोडे, अर्चनाताई शेवणे, शालुताई शितळे, शोभाताई आगासे, सविताताई शेवणे, गौरीताई पातुरकर, यांनी टाळचिपड्या वाजवुन विविध देवतांचे गुनगान करणारे भजन सादर केले तर यांना मृदुंगावर ताल धरून प्रकाश शेवणे यांनी साथ दिली .श्रोते म्हणून शुभांगीताई रेखे, देवयानी कळस्कर यांनी भजन मंडळास टाळया वाजवुन प्रोत्साहन दिले .

# अवैध एल. पी. जी गॅस रिफिलींग करणा-या इसमांवर कार्यवाही..

प्रतिनिधी २५ मार्च

**अमरावती :** दिनांक २४.०३.२०२६ रोजी गुन्हे शाखा, अमरावती शहर चे पथक नागपुरी गेट येथे पॅट्रोलींग करीत असता गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, लालखडी, वॉटर सप्लॅय चे मागे भिवंडी येथे एक ईसम अवैद्य रित्या घरगुती वापरण्यात येणारे गॅस सिलेन्डर मधुन प्रवासी ऑटोरिक्षा मध्ये गॅस रिफिल करीत आहे. सदर माहीती वरुन गुन्हे शाखा येथील पथकाने छापा टाकला असता यातील आरोपी क्रमांक ०२ ऑटोरिक्षा चालक याने त्याचा प्रवासी ऑटो हा आरोपी क्रा. ०१ यांच्या राहत्या घराच्या शेड मध्ये लावला व आरोपी क्रमांक ०१ हा प्रवासी ऑटो रिक्षा मध्ये ईलेक्ट्रीक मोटार व वजन काट्याचे मदतीने गॅस सिलेन्डर मधुन अवैद्य रित्या घरगुती वापरण्यात येणारा एल.पी.जी गॅस रिफीलींग करतांना मिळुन आला. आरोपींना पंचा समक्ष ताब्यात घेवुन गुन्हा करण्या करीता वापरण्यात आलेले साधने त्यांचे कडुन जप्त करण्यात आले.

शेख फरीद शेख नजीर वय ४६ वर्ष रा. भिवंडी वाटर सप्लॅय जवळ लालखडी अमरावती आरोपीचे नाव असून १२००/-रु एक रिकामा असलेला भारत कंपनीचे एल. पी.जि गॅस सिलेन्डर किंमत अंदाजे २५००/- रु एक गॅस फिलींग करीता वापरण्यात आलेली ईलेक्ट्रीक मोटर ज्यावर कंपनीचा उल्लेख नाही. किंमत अंदाजे-१८००/-रु प्रो युनायटेड कंपनीचा ईलेक्ट्रीक वजन काटाएकुण ५५००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मोहम्मद सलमान शेख हमीद वय २४ वर्ष व्यवसाय ऑटो चालक रा. लालखडी अमरावती याच्या तब्यातून किंमत अंदाडे २०००००/-रु- प्रवासी ऑटो क्रमांक MH-27-DZ-0854 असा दोन्ही आरोपीतांकडुन असा एकुण २,०५,५००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर ची कारवाई पोलीस आयुक्त, . राकेश ओला यांचे मार्गदर्शखाली, पोलीस उपआयुक्त (परीमंडळ-०१) . गणेश शिंदे, उपआयुक्त (मुख्यालय) . रमेश धुमाळ, पोलीस उपआयुक्त (परीमंडळ-०२) श्याम घुगे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे विभाग) . शिवाजी बचाटे, यांचे मार्गदर्शनात वरीष्ठ पोलीस निराक्षक संदिप चव्हाण यांचे नेतृत्वाखाली स.पो.नि मनिष वाकोडे, पोहवा सतिष देशमुख, फिरोज खान, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, पोलीस नाईक नाझीमोद्दीन सैय्यद, पोलीस रणजित गावंडे गुन्हे शाखा यांनी केलेली आहे.

## देशभरातील मान्यवरांच्या उपस्थितीत लोक धर्मोत्सवाचा भव्य सोहळा

प्रतिनिधी २५ मार्च

**अमरावती :** भगवान महावीर स्वामींच्या २६२५ व्या जयंतीनिमित्त, राजधानी दिल्लीत 'लोक धर्मोत्सव' या भव्य आणि ऐतिहासिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. राष्ट्रीय स्तरावर धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक सलोखा वाढवणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. हा भव्य कार्यक्रम २५ मार्च रोजी दुपारी २:०० वाजता नवी दिल्लीतील कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडिया येथील मावळंकर सभागृहात आयोजित केला जाईल. अनेक प्रख्यात संत, राजकारणी आणि मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित राहून शोभा वाढवतील. देवेंद्र ब्रह्मचारी आयोजक म्हणून उपस्थित राहतील, तर जनरल डॉ. व्ही. के. सिंग आणि दिल्लीच्या मुख्यमंत्री श्रीमती रेखा गुप्ता प्रमुख पाहुणे असतील. याव्यतिरिक्त, . चिराग पासवान (खासदार), . अर्जुन राम मेघवाल, . हर्षभाई संघवी, उपमुख्यमंत्री (गुजरात), मनोज तिवारी आणि . सुरेश जैन हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. प्रख्यात उद्योगपती आणि समाजसेवक . चंद्रकुमार मधुसूदन जाजोदिया हे या कार्यक्रमाचे यजमान म्हणून महत्त्वाची भूमिका बजावतील. या कार्यक्रमाला साहित्य, उद्योग आणि चित्रपट क्षेत्रातील प्रमुख व्यक्ती, तसेच देशभरातील अनेक ज्येष्ठ राजकारणी उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. भारतीय संस्कृतीची झलक दाखवण्यासाठी विविध नृत्य आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन केले जाईल. हा कार्यक्रम महाविरायतन फाऊंडेशनतर्फे आयोजित केला जात आहे, जे समाजसेवा आणि धार्मिक मूल्यांच्या प्रसारासाठी अथकपणे कार्य करते.

# मुरके भवनात गणगौर उत्सव साजरा

प्रतिनिधी २५ मार्च

**अमरावती -** काठेसू आयी गौरा, काठेसू आया ईसर, कठेसू आया हे गौरी पूजन वाला...तर नदी किनारे नौका डोले, नौका में गणगौर' म्हणत साजरा होणारा व महत्त्वाचा मानला जाणारा 'गणगौर' हा सण मुरके भवन येथे उत्साहात साजरा करण्यात आला.

कथेनुसार गण म्हणजे भगवान शंकर व गौरी म्हणजे देवी पार्वती म्हणून या उत्सवात शंकर व पार्वतीची पूजा मोठ्या आनंदात करण्यात आली. अविवाहित मुलींनी चांगला पती मिळावा यासाठी तर विवाहित स्त्रियांनी पतीच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली. या निमित्ताने शहरातील परिसरातील हनुमान मंदिरापासून डोक्यावर कळस घेऊन शोभायात्रा काढण्यात आली होती.

या सणाची सुरुवात शीतला सप्तमीपासून झाली. या काळात दररोज सायंकाळी महिलांनी



पारंपरिक वेषभूषा करत गौरीच्या मुखवट्यांचे पुजन करत लोकगीते गात होळीच्या राखेपासून सोळा पिंड बनवून या पिंडांची कुंकू, काजळ, मेंदीने पूजा केली. गणगौर उत्सवाच्या पहिल्या दिवशीच 'सिंजारा' हा दिवस साजरा झाला. 'सिंजारा'च्या दिवशी घरात मिष्टान्न करून दुसऱ्या दिवशी म्हणजेच तृतीयेला 'गौर'ची वाजत गाजत पूजन करून पाठवणी करण्यात आली. येथील माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने गणगौर सण उत्साहात साजरा करण्यात आला. होळीपासून ते गुढीपाडव्याच्या दुसऱ्या दिवसापर्यंत हा सण पारंपरिक पद्धतीने संस्कृतीचे जतन करत पारंपारिक वेशभूषा व दागिने परिधान करून करण्यात आला.

याप्रसंगी दुर्गा मुरके, सरला मुरके, डॉ.करूणा मुरके, रेखा मुरके, पुष्पा मुंधडा, सोनल मुरके, विणा मुरके, डॉ.मानसी मुरके, कीर्ती टवानी, डॉ.आरती काबरा, मीरा पनपालीया, नम्रता लाहोटी, डॉ.सुनिता मंत्री, डॉ.सुषमा राठी, ज्योती जाजू, चंचल जाजू, सारिका हरकुट, सिमा जाजू, वर्षा राठी, समृद्धी मुरके, कंचन मुरके, रेवा मुरके, यांसह मोठ्या संख्येने महिला भगिनी व कन्या उपस्थित होत्या.

सिटी न्यूज सुपरफास्ट खामगाव

# एकनिष्ठाच्या वतीने शहीदांना रक्तदान देऊन श्रद्धांजली....!

प्रतिनिधी २५ मार्च

**खामगाव :** सेवेत सदैव कार्यरत असलेल्या एकनिष्ठा गौ सेवा रक्तसेवा फाउंडेशन द्वारा प्रभु श्रीराम नवमी उत्सव समितीकडून २३ मार्च रोजी शहीद भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांना रक्तदान करून श्रद्धांजली वाहिली. सर्व प्रथम भगतसिंग चौक स्थित विर भगतसिंग यांच्या प्रतिमेला मालार्पण करून सामान्य रुग्णालय येथील शासकीय रक्तपेढी मध्ये रक्तदान करण्यात आले बलिदान दिवस सुरजभैय्या यादव, यांनी शहिदांनी आपल्या भारत देशासाठी हसत हसत



फासावर चढले अश्या विर शहीदांचे आदर्श आपल्या डोळ्यासमोर ठेऊन सर्व देश वासियांनी ठेवुन देशाची सेवा केली पाहिजे असे प्रतिपादन केले.

यावेळी रक्तदात्यांनी रक्तदान केले. योगेश राऊत, अक्षयसिंग जाधव, कृष्णा चव्हाण, विनोद पवार, प्रदीप शमी, मुकिंदा बोंबटकार, पवन क्षिरसागर, अनिकेत करांगळे, अनिल चव्हाण, वैभव कापडे, अर्पण यादव, गोलु इंगळे, निलेश चव्हाण, शासकीय रक्तपेढीचे रक्त संक्रमण अधिकारी प्रणाली देशमुख, सपना कांबळे, राजश्री सावके, मेघा इंगळे, राम अंभोरे, भारती काळे आदिनी सहकार्य केले.

महाराष्ट्र शासन
**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपुर**
(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)
**विशेष प्रकल्प जलसंपदा विभाग अमरावती**
**अकोला सिंचन मंडळ, अकोला**
**अकोला पाटबंधारे विभाग, अकोला**
पत्ता:- :- मुर्तीजापूर रोड, पाण्याच्या टाकीजवळ, अकोला ४४४ ००१
ई-मेल पत्ता aklirrigation@gmail.com दुरध्वणी / फॅक्स क्रमांक :- ०७२४-२४३५३१६

**ई-निविदा सुचना क्र. १६ (दुसरी वेळ) सन २०२५-२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे विभाग, अकोला जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासन संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलाड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई- निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे विभाग, अकोला यांनी राखून ठेवले आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रुपये (लक्ष) | बयाना रक्कम (रु) | निविदा संच किंमत (रु) | सा.बां. विभागा कडील कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुर्णा बॅरेज-२ (नेरधामणा) ता. तेल्हारा जि. अकोला प्रकल्पाचे डेक ब्रिजवर वियरींग कोटचे काम, प्रकल्पाचे पोहोच रस्त्याचे भराव व खडीकरणाचे काम व इतर अनुषंगीक कामे. | १७१.७१ | १५००००/- | निविदा किंमत २०००/- + जीएसटी ३६०/- एकूण २३६०/ | खुला कंत्राटदार | १२ महिने (पावसाळा धरून) |

निविदा उपलब्ध कालावधी :- २५/०३/२०२६ ते ०१/०४/२०२६
निविदा उघडणे :- ०६/०४/२०२६

जावक क्रमांक/१३०६/निलि/अपावि/२०२६ दिनांक :- २०.०३.२०२६
कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय
अकोला पाटबंधारे विभाग, अकोला
मुर्तीजापूर रोड, पाण्याच्या टाकीजवळ, अकोला- ४४४ ००१

(चि. वि. वाकोडे)
कार्यकारी अभियंता
अकोला पाटबंधारे विभाग, अकोला

DGIPR-2025-26/6774

## जाहीरनामा

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार श्री. श्रीराम राघोजी जाधव रा. धुमका, ता.जि. वाशिम यांनी मौजे /धुमका येथिल गट नं. 160 मधिल क्षेत्र 0.07 हे आर या जमिनितील 7/12 मधिल इतर अधिकारातील संरक्षित कुळ कुळ या रकान्यात फुल्या कळण्या बंजारी हि कुळाची नोंद कमी करण्यात यावी असा अर्ज या कार्यालयात प्राप्त झाल्यावरून प्रकरण सुरु करण्यात आले.

तरी सदर प्रकरणात मोने धुमका येथिल गट नं. 160 मधिल 0.07 हे आर हे आर या जमिनितील 7/12 मधिल इतर अधिकारातील संरक्षित कुळ कुळ या रकान्यात फुल्या कळण्या बंजारी हि कुळाची नोंद कमी करून मिळणे बाबत प्रकरणात कोणाचे आक्षेप व हरकती असल्यास हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापासून 15 दिवसाचे आत सादर करावेत मुदतीत प्राप्त न झालेल्या आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व प्रकरणात योग्य तो आदेश पारित करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

दिनांक- 13.2.2026
ठिकाण- वाशिम

**तहसिलदार, वाशिम**

# दहीहांडा पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंद्या विरोधात महिलांचा आक्रोश

## कारवाई न झाल्यास १ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी उपोषण



**अकोला :** कुटासा :तालुक्यातील कावसा बु. व कावसा खु. या गावांमध्ये सुरू असलेल्या अवैध देशी-विदेशी दारूविक्री तसेच वरली (जुगार) अड्ड्यांविरोधात ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त करत तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी अकोट यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. गावातील सामाजिक वातावरण बिघडविणाऱ्या या अवैध धंद्यांवर तात्काळ बंदी घालून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.ग्रामस्थांच्या निवेदनानुसार,कावसा बु.कावसा खु. येथे काही व्यक्तींमार्फत बेकायदेशीररित्या दारू विक्री व वरली जुगार अड्डे चालविले जात असून त्यामुळे गावातील युवक मोठ्या प्रमाणात व्यसनाधीन होत आहेत. याचा परिणाम म्हणून कुटुंबांमध्ये वारंवार वाद, भांडणे, मारहाण तसेच कौटुंबिक तणाव वाढत असून सामाजिक स्थैर्य धोक्यात आले आहे. विशेषतः महिला, लहान मुले व मुलींवर या परिस्थितीचा विपरीत परिणाम होत असून अनेक कुटुंबे आर्थिक व मानसिक अडचणीत सापडत आहेत. ग्रामस्थांनी यापूर्वी दिनांक ६ मार्च २०२३ रोजी दहिहांडा पोलीस ठाण्यात निवेदन देऊन कारवाईची मागणी केली होती. मात्र अद्यापही अवैध धंदे सुरूच असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच १८ मार्च २०२६ रोजी रात्री सुमारे ८ वाजताच्या सुमारास निला उमेश वानखडे या महिलेने पतीच्या दारूच्या व्यसनाला कंटाळून विहिरीत उडी घेतल्याची गंभीर घटना घडल्याचे नमूद करण्यात आले आहे. याबाबत पोलिसांना फोनद्वारे माहिती देऊनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.सदर प्रकरणी संबंधित बिट जमादार व ठाणेदार यांना वारंवार माहिती देऊनही अवैध धंदे सुरूच असल्याने गावामध्ये भविष्यात कोणतीही जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे ग्रामस्थांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी लक्ष देऊन सुरु असलेल्या अवैध दारूविक्री व जुगार अड्ड्यांवर तात्काळ बंदी घालून कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, योग्य वेळी ठोस पावले उचलली नाहीत तर १ मे महाराष्ट्र दिनी जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे साखळी उपोषण करण्यात येईल असा इशारा दिला. निवेदनासोबत ग्रामपंचायत कावसा बु.कावसा खु. यांचा दारूबंदी ठराव, महिला बचत गटाचा ठराव, ग्रामस्थांच्या सह्यांची प्रत तसेच संबंधित एन.सी.ची नक्कल जोडण्यात आली आहे.सदर निवेदनावर रमाई महिला संघ,त्रिरत्न प्रबोधन मंच, बुद्धविहार समन्वय महासंघ अकोला, राष्ट्रीय लोक आंदोलन अकोला आदी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी सह्या केल्या आहेत. तसेच या प्रकरणाची प्रत उपविभागीय पोलिस अधिकारी अकोट,तहसिलदार अकोट व उपविभागीय अधिकारी अकोट यांना देण्यात आली आहे. निवेदन देताना ग्रामपंचायत सदस्य उषा वानखडे, सुमित्रा वानखडे, वेणूताई वानखडे, यमुनाबाई वानखडे, विशाखा वानखडे, पद्मा वानखडे, मनोरमा वानखडे, सुशीला पोहरकार, अलका वानखडे, अन्नपूर्णा वानखडे, दिपाली उमाळे, इंदुताई वानखडे, तंटामुक्ती अध्यक्ष विठ्ठल तळी, सामाजिक कार्यकर्ते किसनराव सावळे, मनोहर वानखडे, हरिदास लोणकर, गजानन कदम, पत्रकार सोनू जाधव, राजकुमार वानखडे, मा प.स. सदस्य अंबादास उगले,अनुप बुटे, समाजसेवक गजानन हरणे आदि विविध मान्यवर निवेदन देताना उपस्थित होते.

## हिवरखेड पोलिसांनी दिले ४ गुरांना जीवनदान




**हिवरखेड :** पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या झरीबाजार जवळी असलेल्या फोकरतया नाल्याने २५ मार्चच्या सकाळी ४ गुरे गोपनीय मार्गाने येत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळताच पोलिसांनी सिनेस्टाईल सापडा रचून चार गुरांना जीवनदान दिले मात्र आरोपीचा शोध सुरू आहे,ही कारवाई रामनवमीच्या पर्वावर झाल्याने गोप्रेमींनी हिवरखेड पोलिसांचे कौतुक केले.

## न्यू इंग्लिश हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालयाच्या यशात मानाचा तुरा

**अकोला :** ध्येय एज्युकेशन फाउंडेशन, पुणे या संस्थेतर्फे अकोला एज्युकेशन सोसायटी द्वारे संचालित न्यू इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयास आदर्श शाळा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. संस्थेच्या लौकिकात त्यामुळे भर पडली आहे. अकोला एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी, मुख्याध्यापक माधव मुंशी आणि सहकारी यांच्यासाठी हा आनंदाचा क्षण ठरला आहे. पुरस्कार नव्या दमाने काम करण्याची उमेद देतो अशी भावना व्यक्त करण्यात आली.

## उद्या अविनाश परळीकर यांचे कीर्तन

**अकोला :** श्री राम नवमी निमित्त २६ मार्च रोजी सकाळी १० वाजता कीर्तनकार ह.भ.प.



अविनाश परळीकर यांचे कीर्तन होणार आहे. गुरूवारी राम नगरातील श्री गजानन महाराज मंदिरात कीर्तन होणार आहे. अविनाश परळीकर यांचे कीर्तन विविध ठिकाणी होते तसेच श्रोत्यांचा चांगला प्रतिसाद मिळतो. उद्या रामजन्माचे कीर्तन असून राम नगर तसेच परिसरातील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

उमलत्या कळ्या

वाढदिवस



चि. स्वामी उर्फ धनुष अर्जुन खिरोडकार

रा. हिवरखेड

## श्री क्षेत्र घटाळी येथे श्रीमद् ब्रह्मविद्या अमृत मंथन सोहळा



प्रतिनिधी २५ मार्च

**आलेगाव :** श्री क्षेत्र महानुभाव पंथीय घटळी संस्थान येथे स्मृतीस्थळ नामधारक वासनिकांचा आचारधर्म नामस्मरण अन्नदान ज्ञानप्रबोधन यज्ञ अखंड ११ दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले असून प. पू. प. म. श्री गोमराज बाबाजी कारंजेकर यांच्या अमृत वाणीतून श्रीमद् ब्रम्हविद्या अमृत मंथन सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

पातूर तालुक्यातील चिखलवाड श्री क्षेत्र घटाळी येथे दिनांक १९ ते २९ तारखे पर्यंत ११ दिवस अखंड भव्य यात्रा महोत्सवा सह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून प. पू. प. म. श्री गोमराज बाबा कारंजेकर यांच्या अमृत वाणीतून श्रीमद् ब्रम्हविद्या अमृत मंथन सोहळा अंतर्गत स्मृताथळ नामधारक वासनिकांचा आचारधर्म नामस्मरण अन्नदान ज्ञान प्रबोधन यज्ञ संत महंत भिक्षुक वासनिक बंधू भगिनी यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित केला असून कार्यक्रम उद्घाटन सोहळा प. पू. त. श्री गुरुवर्य पूनम बाईजी यांच्या हस्ते करण्यात आले आहे.तसेच प्रवचनकार प. पू. त. सुनंदाताई आंबेकर श्री चक्रधर स्वामी लीळा चरित्रावर प्रवचन सोहळा,आणि गुरु पूजन सोहळा,दिनांक २७ रोजी राहणार असून परमार्ग सेवक महंत श्री रामसगावकर बाबा उपाख्य बालकृष्ण मेहकरकर संचालक तथा पुजारी श्री क्षेत्र घटाळी संस्थान यांच्या अमृत वाणीतून प्रवचन दिनांक २६ रोजी तसेच आचार्य प. पू. म. श्री लाड बाबा यांच्या अमृत वाणीतून दिनांक २६ रोजी आशीर्वाद पर मार्गदर्शन सोहळा आणि दिनांक २९ रोजी भव्य पालखी मिरवणूक सोहळा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून सर्व भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे श्री क्षेत्र घटाळी संस्थानचे संचालक तथा पुजारी प.पू.बाळकृष्ण मेहकरकर यांनी पत्रका द्वारे जाहीर केले आहे.

# पोलिस अधीक्षक अर्चित चांडक वैभव पुरकाराने सन्मानित



प्रतिनिधी २५ मार्च

**अकोला :** माऊली फांउडेशन तर्फे वार्षिक पुस्काराची घोषणा गुढीपाडवाच्या मुहर्तावर करण्यात आली. पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या कार्यकाळात कायदा -सुरक्षा तत्पर राहून आरोपीना त्वरीत पायबंद घातला गेला. या कार्याची दखल माऊली फांउडेशने अकोला -वैभव पुरस्काराने त्यांच्या कार्यालयात जाऊन सत्कार केला. मेमेंटो , सन्मानपत्र,पुरस्कार राशी १ ,१११/शाल पुष्पगुच्छ देवून सन्मानित केले. पोलीस अधिक्षक यांनी फांउडेशनच्या सत्काराचा आदर पुर्ण स्वीकार करून आभार मानले परंतु धनादेश स्वतः न स्विकारता पोलीस कल्याण निधी फंडास हस्तातंरीत केला . यावेळी सुद्धा पोलीस बांधवा प्रती समपर्ण भावना व्यक्त केली. यावेळी फांउडेशनचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मांडेकर , उपाध्यक्ष , सैय्यद रब्बानी , सचिव अशोक पारधी , संचालक मंगेश लांडे ,अजय बांडी, गोपालसिंह गौत्तम , संतोष देशमुख आदि मान्यवर उपस्थित होते .

# जिप प्राथमिक शाळा अकोली रूप येथील विद्यार्थ्यांची पोलिस स्टेशन हिवरखेडला भेट

प्रतिनिधी २५ मार्च

**अडगाव :** बाल गुन्हेगारीपासून विद्यार्थांनी स्वतःला कसे सुरक्षित ठेवावे या उद्देशाने जिप प्राथमिक शाळा अकोली रुपराव येथील इयत्ता ४ थी ते ८ वी मधील विद्यार्थ्यांनी हिवरखेड पोलिस ठाण्यात भेट दिली.

बालगुन्हेगारी पासून कसे वाचावे. सायबर गुन्हेगार कशी फसवणूक करतात. पोलिसांच्या नावाने कसे फ्रॉड कॉल येऊ शकतात त्यापासून स्वतःला कसे सुरक्षित ठेवायचे. तसेच मुलींना विशेष दामिनी पथकाच्या मॅडम यांनी मार्गदर्शन केले. गुड टच आणि बॅड टच कसे ओळखावे याविषयी माहिती दिली. गुन्हा केल्यास त्यातील मुद्देमाल कसा असतो हे प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना दाखविले.



वायरलेस यंत्रणा कशाप्रकारे काम करते हे प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले त्यानंतर क्राईम डायरी या क्राईम डायरीमध्ये गुन्ह्यांची नोंद कशाप्रकारे केली जाते रिपोर्ट कशाप्रकारे स्वीकारण्यात येतात या सर्व गोष्टींची विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष माहिती देण्यात आली. अपघातामध्ये असलेले वाहन कशा प्रकारे ठेवण्यात येते तसेच चोरून आणलेले वाहनांची विल्हेवाट कशी करण्यात येते याची माहिती देखील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दाखविण्यात आली. विद्यार्थ्यांनी अनेक प्रश्न पीएसआय, ठाणेदार यांना विचारले. विद्यार्थ्यांच्या उत्तरे दिली. शाळेचे मुख्याध्यापक किशोर कोल्हे, जेष्ठ शिक्षक आनंद नांदुरकर, अमोल ढोकणे उपस्थित होते. हिवरखेड पोलिस स्टेशनचे ठाणेदार गजानन राठोड, पीएसआय श्रीराम जाधव, गुंजम, रघुवंशी मॅडम, दामिनी पथक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# संत गजानन महाराज संस्थानचा भक्ताला आलेला सुखद अनुभव

प्रतिनिधी २५ मार्च

**अकोला :** मार्चच्या सहा तारखेला निवृत्त शिक्षक मनोहर लऊळ शेगावला गजानन महाराजांचे दर्शन घेण्यासाठी गेले होते. मुक्काम संस्थानच्या वारकरी संकुलात केला. दुपारी चहासाठी कॅश काऊंटरवर डिजीटल पेमेंटची चौकशी केली परंतु ती व्यवस्था नसल्याचे सांगण्यात आले. म्हणून पाच रूपयांची नोट व दोन रुपयाचे नाणे दिले. पण पांच रुपयांची नोट चालत नसल्याचे सांगितले. दहा रुपयाची नोट दिली बऱ्याच वेळाने सुटे पैसे आल्यावर चहा घेतला.

तक्रार/सूचना रजिस्टर मध्ये हा प्रकार सविस्तर लिहिला व डिजीटल पेमेंटची व्यवस्था करण्याची नम्र विनंती केली. जेणेकरून भक्त व संस्थान सर्वांनाच सोयीचे होईल. हे मी एव्हाना विसरलो होतो.

....पण अहो आश्चर्यम. लऊळ यांना २२ मार्च रोजी संस्थानतर्फे निलेश माळी यांचा फोन आला व पाच रुपयांची नोट स्वीकारण्या बद्दल सूचना देण्यात आली आहे, तसेच डिजीटल पेमेंटची व्यवस्था लवकरच सुरु करण्यात येणार आहे. ही प्रणाली कार्यान्वित करणे व सेवकांना प्रशिक्षण देणे यासाठी थोडा वेळ लागेल. खरंच तत्पर व नम्र सेवा आणि पारदर्शक व्यवहार यासाठी संत गजानन महाराज संस्थान केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात प्रसिद्ध आहे असा अनुभव सध्या पुण्याला असलेले मनोहर लऊळ यांना आला.

# दहिहांडा पोलिसांच्या तत्परतेने गोवंशांना जीवदान

प्रतिनिधी २५ मार्च

**कुटासा:** २३ रोजी पोलीस स्टेशन दहिहांडा येथील सहायक फौजदार अनंत मुळे व प्रमोद दळवी हे खाजगी वाहनाने पेट्रोलींग करीत असताना प्राथमिक आरोग्य केंद्रा समोर नाकाबंदी केली. टाटा मॅजीक क्रमांक एम एच ३०एबी ०६८८ या वाहनामध्ये दोन गोवंश जातीचे जनावरे दर्यापुरकडुन दहिहांडा गावाकडे येताना दिसले. वाहन थांबवून पंचासमक्ष पाहणी केली असता वाहनामध्ये एक लाल भुरकट रंगाचा गो-हा दोराने बांधलेला व एक जांभळट रंगाचा गो-हा दोराने बांधलेला आढळला. जनावरांच्या मालकी हक्काबाबत पावत्या नसलेले



आरोपी जुनेद खान सत्तार खान रा. टाटानगर दर्यापुर जि. अमरावती हा कत्तलीकरीता घेवुन जातांना दिसून आला. गोवंश आणि वाहन असा २,२०,००० रु.चा मुद्देमाल जप्त करून ताब्यात घेतला. पोलिस स्टेशन दहिहांडा येथे प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही पोलिस अधीकक अर्चित चांडक, अप्पर पोलिस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, सहायक पोलिस अधीक्षक निखील पाटील यांचे मार्गदर्शनामध्ये सहायक पोलीस निरीक्षक गोपाल ढोले व सहकारी यांनी केली.

# अकोटमध्ये बेकायदेशीर दर्ग्याच्या नावाखाली मिनी स्टेडियम अडवण्याचा आरोप; कारवाईची मागणी

प्रतिनिधी २५ मार्च

**अकोट :** अकोट शहरातील गांधी मैदान परिसरात उभारण्यात येणाऱ्या मिनी स्टेडियमच्या विकासकामात अडथळा निर्माण करण्यासाठी बेकायदेशीर कबरीला 'दर्गा'चे स्वरूप देत राजकारण केले जात असल्याचा गंभीर आरोप करत तात्काळ अतिक्रमण हटविण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देत प्रशासनाने कोणत्याही दबावाला बळी



न पडता कारवाई करावी, असा इशारा देण्यात आला आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, संबंधित जागा ही नगर परिषदेच्या मालकीची असून विकास आराखड्यानुसार ती क्रीडा सुविधेसाठी राखीव आहे. मात्र, अलीकडेच एका जनावराच्या कबरीला कथित दर्ग्याचे स्वरूप देत अनधिकृत अतिक्रमण करण्यात आले असून, त्यासाठी कोणतीही शासकीय परवानगी घेतलेली नाही. तसेच त्या ठिकाणाची महसूल किंवा नगर परिषद नोंदीत कोणतीही नोंद नसल्याचा दावा करण्यात आला आहे. काही समाजकंटकांकडून जाणीवपूर्वक दोन समाजांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत असून, मिनी स्टेडियमचे काम रोखण्यासाठी हा प्रकार घडवून आणल्याचा आरोपही करण्यात आला. संबंधित कबरीला कोणतीही अधिकृत विश्वस्त नोंदणी नसून, नियमित धार्मिक उपक्रमही होत नसल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, काही नगरसेवकांनी अतिक्रमण हटवू नये, असे निवेदन दिल्याची बाब समोर आली असून, हे कायद्याच्या विरोधात असल्याचे सांगत अशा लोकप्रतिनिधींवर चौकशी करून अपात्रतेची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# महिलांनो स्वत :ची ओळख निर्माण करा : सीमाताई बोके

प्रतिनिधी २५ मार्च

**अकोट :** स्थानिक पुष्पांजली मंगल कार्यालय येथे जिजाऊ ब्रिगेड व धारिणी फाऊंडेशनच्या वतीने आयोजित जागतिक महिला दिनाचा सोहळा दोन सत्रांमध्ये झाला. ब्रह्मकुमारीज सेवा केंद्राच्या जयश्री दीदी, जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्षा सीमाताई बोके यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने शुभारंभ झाला. सीमाताई बोके यांनी महिलांना 'स्वतःचे अस्तित्व नीर्माण करा, निर्णयक्षम बना आणि अंधश्रद्धांना दूर ठेवा'असा स्पष्ट संदेश देत उपस्थित महिलांच्या मनात नवी ऊर्जा निर्माण केली.



पुणे ग्रीन वर्क्स ट्रस्टच्या रुपाली नाईक यांनी पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापनावर अत्यंत अभ्यासपूर्ण मार्गदर्शन करत कचऱ्याचे वर्गीकरण, पुनर्वापर, खतनिर्मिती आणि स्वावलंबनाचे महत्त्व पटवून दिले. अध्यक्षस्थानी धारिणी फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. मनीषाताई मते होत्या, त्यांनी 'प्रत्येक नागरिकाने जबाबदारी घेतली तर अकोट शहर कचरा मुक्त होऊ शकते' असे सांगत महिलांना कृतीशील होण्याचे आवाहन केले. प्रा.नेहाताई झाडे यांनी शैक्षणिक क्षेत्रातील अनुभवातून महिलांना मार्गदर्शन केले. तर, डॉ. अनिल माभुळकर यांनी विचार मांडले.

मंचावर नगराध्यक्षा मायाताई धुळे, मराठा सेवा संघ ता.अ. राममूर्ती वाळशिंगे, भगत, माजी नगराध्यक्षा पुष्पाताई पुंडेकर, महिला व बालकल्याण सभापती नयनाताई इंगोले, लताताई चिकटे, नगरसेविका निकिता जुनघरे, शुभांगी टेमझरे, त्रिया मगर, जि. ब्रि.अध्यक्षा भैरवी हिंगणकर, डॉ. रुपाली सोनटक्के, डॉ. मेघना पोटे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊच्या लेकीनी पूजन करून वारकरी दिंडीच्या माध्यमातून 'रामकृष्ण हरी' च्या गजरात पाहुण्यांचे स्वागत करून झाली. स्वागत गीत व जिजाऊ बंदनेने बातावरण भारावून गेले, जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने साकारण्यात आलेल्या रमाबाईच्या भूमिकेत सीमा आगरे व जिजाऊच्या भूमिकेत स्वाती गोरे यांच्या इतिहासातील स्त्रीशक्तीचा प्रेरणादायी प्रवास जिवंत केला. धारिणी फाऊंडेशनच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाच्या महिलांचा व युवतींचा सन्मान करण्यात आला, महिला पत्रकार चंचल पितांबरवाले, शैक्षणिक यशासाठी भावना केदार, विजया अस्वार यांचा गौरव करण्यात आला. महिलांमध्ये डॉ. मेघना पोटे, डॉ.रुपाली सोनटक्के संगीताताई खेमरे,आशाताई कदम व त्यांच्या सोनबर्डी गटाच्या कार्याचे विशेष कौतुक करत करण्यात सत्कार आला, कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्नेहल अभ्यंकर यांनी प्रास्ताविक, वैशाली बाभुळकर व अर्चना सावरकर सूत्रसंचालन उत्कृष्टपणे केले. तसेच जिजाऊ ब्रिगेडच्या व धारिणी फाऊंडेशनच्या व त्यांचा संपूर्ण समूह यांनी केलेल्या परिश्रमांचे सर्वत्र कौतुक झाले, पहिल्या सत्राचा समारोप 'वंदे मातरम' ने झाला तर दुसऱ्या सत्रात जिजाऊ ब्रिगेडच्या लताताई चिकटे यांच्या अध्यक्षीय व समारोपिय भाषणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# हातरुण येथे ईदमिलन सोहळा संपन्न



प्रतिनिधी २५ मार्च

**हातरुण :** येथे २४ मार्च रोजी संध्याकाळी जमाते इसलामी हिंद शाखा हातरुणच्या वतीने सर्वधर्मीय ईद मिलन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. आयोजीत कार्यक्रमाचे प्रमुख वकते वाजीद कादरी संभाजी नगर, सुधाकर पारस्कर माजरी, श्रीकृष्णा अढाउ महाराज, डोंगरे, श्रीकृष्णा सांगळे या सर्वांनी विचार व्यक्त केले. यावेळी एसआयओचे कार्यकर्ते तथा सैय्यद काझीम अली भास्कर डोंगरे . शेख राजीक . शेख आबेद . सैय्यद अकिल सैय्यद आबेद .गावातील व खेडे पाडयातील सर्वसमाजाचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**CHANGE IN NAME**

I Have Changed My Name From **RAJENDRAKUMAR GODA** TO **RAJENDRA HIMATLAL GODA** Passport No :- N2565553 My Residential Address in:- Atul Niwas Opp Shiram Hospital, Shastari Nagar Akola 444001

# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

बुधवार, दि. २५ मार्च २०२६

https://epaper.citynewssuperfast.com


# नेरमध्ये व्यावसायिकाची हत्या; तीन आरोपी जेरबंद

प्रतिनिधी २५ मार्च

**यवतमाळ :** नेर शहरातील काश्मीर नगर परिसरात मंगळवारी दुपारी घडलेल्या हल्ल्यात पानटपरी व्यावसायिकाचा मृत्यू झाला. मुलीच्या छेडछाडीला विरोध केल्याच्या वादातून ही घटना घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले असून पोलिसांनी तिघा संशयितांना ताब्यात घेतले आहे. शहेबाज हसन तसदीक हसन पठाण (४०) असे मृतकाचे नाव आहे.

तर मोहम्मद साहिल इस्त्राईल (१९), फैजान खान उर्फ सोनू (२४)



आणि उजेब खान (२१) सर्व रा. नेर अशी आरोपींची नावे आहे.

मृतकाची अल्पवयीन मुलीला काही दिवसांपासून आरोपींकडून ये-जा करताना त्रास दिला जात असल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत मुलीने वडिलांना सांगितल्यानंतर शहेबाज यांनी संबंधित तरुणांना समज देऊन हा प्रकार थांबवण्याचा प्रयत्न केला होता.

मंगळवारी दुपारी सुमारे एकच्या सुमारास शहेबाज आपली पानटपरी बंद करून घरी जात असताना त्यांच्या घरासमोर आरोपी बसलेले होते. त्यांना पाहताच शहेबाज यांनी विचारणा केली असता किरकोळ वाद झाला. या वादातून आरोपींनी त्यांना दुचाकीवरून खाली ओढत चाकूने छाती व पोटावर वार केल्याचे सांगण्यात येते.

हल्ल्यानंतर गंभीर जखमी झालेल्या शहेबाज यांना नातेवाइकांनी तातडीने शासकीय रुग्णालयात नेले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

या प्रकरणी जावेद यांच्या तक्रारीवरून मोहम्मद साहिल इस्त्राईल (१९), फैजान खान उर्फ सोनू (२४) आणि उजेब खान (२१) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी तिघांनाही ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.

# जिनिंगला भीषण आग; लाखो रुपयांचा कापूस खाक



प्रतिनिधी २५ मार्च

**पांढरकवडा :** शहरातील आशापुरा जिनिंग मिलला मंगळवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत मिलमधील लाखो रुपयांचा कापूस जळून खाक झाला. पांढरकवडा नगर परिषदेची अग्निशमन वाहन ऐनवेळी नादुरुस्त असल्याने आग नियंत्रणात आणण्यास विलंब झाला आणि नुकसान मोठे झाले.

'गिमा टेक्स प्रायव्हेट लिमिटेड'च्या कापूस व डुग्या वाहून नेणाऱ्या सायलेन्सरमधून उडालेल्या ठिणगीमुळे ही आग लागल्याची प्राथमिक चर्चा घटनास्थळी आहे. वाऱ्याच्या वेगामुळे आगीने क्षणार्धात रौद्ररूप धारण केले आणि साठवलेला कापूस पूर्णपणे जळाला.

आगीची माहिती मिळताच पांढरकवडा नगर परिषदेच्या अग्निशमन दलाला बोलावण्यात आले. मात्र, तांत्रिक बिघाडामुळे अग्निशमन वाहन घटनास्थळी पोहोचू शकले नाही. परिणामी, आग आटोक्यात आणण्यास विलंब झाला. अखेर वणी, घाटंजी, राळेगाव आणि यवतमाळ येथून अग्निशमन गाड्या बोलावण्यात आल्या. या चारही ठिकाणच्या अग्निशमन जवानांनी अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवले.

या दुर्घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र मिल मालकाचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

ऐनवेळी नगर परिषदेची अग्निशमन वाहन नादुरुस्त असल्याने नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. पालिकेच्या अग्निशमन यंत्रणेच्या देखभालीकडे झालेल्या दुर्लक्षामुळेच हे मोठे नुकसान झाल्याची चर्चा शहरात रंगली आहे.

# डॉ. कार्तिक चाटे यांना एमबीबीएस पदवी प्रदान



प्रतिनिधी २५ मार्च

**आर्णी :** ग्रँट मेडिकल कॉलेज आणि सर जे.जे. ग्रुप ऑफ हॉस्पिटल, मुंबई येथे झालेल्या वैद्यकीय पदवीदान समारंभात आर्णी येथील डॉ. ज्योत्स्ना दहिफळे चाटे यांच्या सुपुत्र डॉ. कार्तिक व्यंकटजी चाटे यांना एमबीबीएस पदवी प्रदान करण्यात आली.

समारंभानंतर डॉ. कार्तिक यांनी आपल्या भावना व्यक्त करताना म्हटले, "आर्णी शहरातील गोरगरीब व गरजू रुग्णांची सेवा हेच माझे ध्येय आहे. आई-वडिलांच्या स्वप्नाला परिश्रमाने पूर्ण करणे, हाच माझा मानस आहे." या यशस्वी वैद्यकीय पदवीदानाबद्दल डॉ. कार्तिक यांचे आप्तेष्ट, शिक्षकवृंद, मित्रपरिवार आणि आर्णीकरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या यशामुळे आर्णी शहराचे वैभव वाढले असल्याचे सर्वत्र सांगितले जात आहे.

# एमपीएससीत अपयश; इंजिनिअर तरुणाची आत्महत्या

प्रतिनिधी २५ मार्च

**उमरखेड :** तीन वर्षांपासून सातत्याने एमपीएससी स्पर्धा परीक्षेची तयारी करत असतानाही अपेक्षित यश मिळाले नाही, या नैराश्याने ३४ वर्षीय इंजिनिअर तरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना दयानंद कॉलनीत घडली. या घटनेने परिसरात एकच हळहळ व्यक्त होत आहे.

सचिन अशोक शिंदे (वय ३४, रा. दयानंद कॉलनी, उमरखेड) असे मृतकाचे नाव आहे. तो मुळचा हदगाव तालुक्यातील उंचेगावचा रहिवासी होता. इंजिनिअरिंग पदवीधर असलेला



सचिन गेल्या अनेक वर्षांपासून आईसोबत उमरखेडमध्ये राहत होता. त्याचा भाऊ हदगाव येथे ग्रामसेवक म्हणून कार्यरत आहे.

सचिनने इंजिनिअरिंग पूर्ण केल्यानंतर गेल्या तीन वर्षांपासून एमपीएससी परीक्षेच्या अभ्यासात पूर्ण वेळ घालवला होता. मात्र वारंवार अपयश येत राहिल्याने तो मानसिकदृष्ट्या व्यथित झाला होता. शेवटी २३ मार्च रोजी सायंकाळी ४ ते ५ च्या दरम्यान त्याने घरीच गळफास घेऊन जीवनयात्रा संपवली.

सायंकाळी ७ वाजता त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी उत्तरवार उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आला. हिंदू मोक्षधाम येथे त्याचे अंत्यसंस्कार करण्यात आले.

सचिनच्या अकाली निधनाने कुटुंबीयांचा शोक तर आहेच, पण परिसरातील नागरिक आणि एमपीएससी अभ्यासकांमध्येही खळबळ उडाली आहे. स्पर्धा परीक्षांच्या तयारीत येणारे मानसिक ताण, अपयश आणि एकाकीपणा याकडे समाजाने गांभीर्याने पाहावे, अशी भावना व्यक्त होत आहे.

# आर्णीत रंगणार कव्वालीचा मुकाबला

प्रतिनिधी २५ मार्च

**आर्णी :** शहरातील शिवनेरी चौकातील श्री. म. द. भारती महाविद्यालय ग्राउंड, गांधीनगर येथे आज बुधवार सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत भव्य कव्वाली स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. समस्त बाबा सैलानी भक्तगण, आर्णी यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाबाबत संगीत रसिकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

या स्पर्धेत नागपूरचे नामवंत कव्वाल काशीफ मिर्झा आणि नसीम जानी यांच्यात रंगतदार मुकाबला रंगणार आहे. दोन्ही कलाकार आपल्या सुरेल आवाज व प्रभावी




सादरीकरणासाठी ओळखले जातात. त्यामुळे हा सामना अत्यंत चुरशीचा होणार असल्याची चर्चा आहे.

संगीतप्रेमींसाठी ही एक खरी पर्वणी ठरणार असल्याने मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# जिजाऊ ब्रिगेडचे ३ एप्रिलला राज्य महाअधिवेशन

प्रतिनिधी २५ मार्च

**आर्णी :** महिलांचे सामाजिक, सांस्कृतिक व वैचारिक विचारपीठ असलेल्या जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने ३ एप्रिल २०२६ रोजी मुंबई येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिर (दादर) येथे राज्यस्तरीय महाअधिवेशन आयोजित करण्यात आले आहे.

या अधिवेशनात महाराष्ट्रासह देशभरातून जवळपास एक हजार महिला पदाधिकारी आणि प्रत्येक जिल्ह्यातील असंख्य कार्यकर्त्या सहभागी होणार आहेत.

अधिवेशन एकूण चार सत्रांमध्ये पार पडणार असून, उद्घाटन मुंबई महानगरपालिकेच्या महापौर शिवमती रितूताई तावडे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्षा शिवमती सीमाताई बोके राहतील.

कार्यक्रमात विविध सुप्रसिद्ध वक्त्यांचे मार्गदर्शन लाभणार असून, अधिवेशनस्थळी जिजाऊ ब्रिगेडच्या स्मरणिकेचे प्रकाशनही करण्यात येणार आहे.


मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. पुरुषोत्तम खेडेकर, शिवधर्म संसद सदस्य शिवमती रेखाताई खेडेकर, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष इंजि. विजय घोगरे, राज्य कार्याध्यक्ष शिवश्री नवनाथ घाडगे, प्रदेश महासचिव चंद्रशेखर शिखरे, जिजाऊ ब्रिगेड महासचिव स्नेहाताई खेडेकर, आंतरराष्ट्रीय अध्यक्षा मयुराताई देशमुख, राष्ट्रीय अध्यक्ष निर्मलाताई पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हा अध्यक्ष (दक्षिण) सगिता किशोर रावते यांनी महाराष्ट्रातील, जिल्हा व शहरातील सर्व महिलांना या वैचारिक प्रबोधन व सांस्कृतिक उपक्रमांचा लाभ घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

राज्य उपाध्यक्ष अंजलीताई भोसले, मुंबई अध्यक्ष स्मिता देसाई, नवी मुंबई अध्यक्ष भारतीताई पाटील यांच्यासह मुंबई व ठाणे जिल्ह्याच्या सर्व टीम अथक परिश्रम घेत आहेत.

# जिल्ह्यातील नगरपरिषदा-नगरपंचायतींना प्रत्येकी १ कोटी

## बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान



प्रतिनिधी २५ मार्च

### निधी वापराबाबत बंधनकारक नियम

- किमान ५० टक्के निधी मराठी शाळांच्या दर्जोन्नतीसाठी खर्च करणे अनिवार्य आहे. उर्वरित निधी आरोग्य केंद्र, महिलांसाठी सॅनिटरी पॅड मशीन, स्वच्छता आणि पर्यटन विकासासाठी वापरला जाणार आहे. पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी या निर्णयाबद्दल उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. या अभियानाचा प्रारंभिक कालावधी एक वर्षाचा असून, कामगिरीनुसार तो वाढवला जाणार आहे. तसेच विकास कामांवर आधारित स्पर्धा आयोजित करून विजेत्या महानगरपालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायतींना आकर्षक पारितोषिके देण्यात येणार आहेत.

**यवतमाळ :** राज्य शासनाने 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान' राबविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या अभियानांतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींना प्रत्येकी एक कोटी रुपयांचा विशेष निधी मंजूर करण्यात आला आहे.

या निधीमुळे जिल्ह्यातील 'अ' वर्गातील यवतमाळ, 'ब' वर्गातील दिग्रस, पुसद, उमरखेड, वणी, 'क' वर्गातील घाटंजी, आर्णी, दारव्हा, नेर, पांढरकवडा या नगरपरिषदा आणि राळेगाव, कळंब, महागांव, मारेगांव, बाभुळगांव, झरी जामणी, ढाणकी या नगरपंचायतींना मराठी शाळांची दर्जोन्नती, आरोग्य सुविधा, स्वच्छता, पर्यावरण संरक्षण आणि पर्यटन विकासासाठी मोठी मदत होणार आहे.

# अचानक पेट्रोल पंप बंद!; नागरिकांत संभ्रम



प्रतिनिधी २५ मार्च

**पुसद :** शहरातील प्रमुख पेट्रोल पंप अचानक बंद पडल्याने पुसदकरांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. मंगळवारी सकाळपासून 'नो स्टॉक'चे बोर्ड लावल्याने इंधन भरण्यासाठी आलेल्या वाहनांची लांबच लांब रांग लागली. काही पंप पूर्णपणे बंद झाले आहेत.

नागरिक म्हणतात, "कालपर्यंत सर्व ठीक होते, आज एकदम काय झाले?" अशी चर्चा सर्वत्र रंगली आहे. अनेकजण रिकाम्या टाकीने परत गेले, तर काहींनी शेजारच्या गावाकडे धाव घेतली. शेती व दैनंदिन वाहतुकीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. प्रशासनाकडून लवकर स्पष्टीकरणाची मागणी जोर धरत आहे.

# तरुणीची फसवणूक करून छळ

प्रतिनिधी २५ मार्च

**वणी :** वणी बसस्थानकावर वैद्यकीय प्रमाणपत्रासाठी आलेल्या एका तरुणीची फसवणूक करून तिला दवाखान्यात नेल्यानंतर अज्ञात तरुणाने वारंवार फोन करून छळ केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी वणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून, सीसीटीएनएस प्रणालीद्वारे मुकुटबन पोलिस ठाण्यात हस्तांतरित करण्यात आले आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी शासकीय रुग्णालयात मेडिकल सर्टिफिकेट काढण्यासाठी बसस्थानकावर नातेवाईकाची वाट पाहत होती. बराच वेळ झाल्यानंतर एका अनोळखी तरुणाने तिच्याशी ओळख करून घेत, "माझ्या ओळखीचा डॉक्टर आहे," असे सांगत मोटारसायकलवरून दवाखान्यात नेले.

नंतर आरोपीने पीडितेच्या नातेवाईकांना फोन करून तिला दवाखान्यात नेल्याचे सांगितले आणि वारंवार संपर्क साधण्यास सुरुवात केली. तिने भेटण्यास नकार दिल्यानंतर आरोपीने अश्लील शिवीगाळ केली. इतकेच नव्हे तर त्याने तरुणीच्या आईलाही फोन करून लग्नाची इच्छा व्यक्त केली. या प्रकारामुळे संतप्त कुटुंबीयांनी वणी पोलिसांत धाव घेत तक्रार दाखल केली. ठाणेदारांच्या आदेशानुसार गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नका, सतर्क राहा, असे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

# विदर्भातील पहिले ३३ केव्ही सौर उपकेंद्र जाम बाजार येथे कार्यान्वित

प्रतिनिधी २५ मार्च

**यवतमाळ :** मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत पुसद तालुक्यातील जाम बाजार येथे विदर्भातील पहिले ३३ केव्ही उपकेंद्र आज कार्यान्वित करण्यात आले. या उपकेंद्रामुळे परिसरातील शेतकऱ्यांना दिवसा खात्रीशीर वीज पुरवठा मिळणार असल्याने शेतकरी व वीज ग्राहकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

या उपकेंद्राचे उद्घाटन अधीक्षक अभियंता दीपाली माडेलवार, कार्यकारी अभियंता जनार्धन चव्हाण, शशांक पोंक्षे, उपकार्यकारी



अभियंता सुहास मेश्राम व प्रविण गवळी यांच्या उपस्थितीत झाले.

मुख्य अभियंता अशोक साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अधीक्षक अभियंते प्रविण दरोली, दीपक देवहाते व दीपाली माडेलवार यांच्या पुढाकाराने ही योजना वेगाने राबवली जात आहे. परिमंडळातील सुमारे २ लाख ८० हजार शेतकऱ्यांपैकी जवळपास ७० टक्के शेतकऱ्यांना आता दिवसा वीज मिळू लागली आहे.

१० एमव्हीए क्षमतेच्या या उपकेंद्रातून ११ केव्हीचे एकूण ६ फीडर कार्यान्वित करण्यात आले आहेत. यात जाम बाजार, पारवा व वानवारला या भागांसाठी प्रत्येकी ३ कृषी व ३ गावठाण फीडरचा समावेश आहे.

या उपकेंद्रामुळे परिसरातील सुमारे ५ हजार वीज ग्राहकांना दर्जेदार वीज पुरवठा मिळणार आहे. यात २,४५० शेतकरी, २,२०० घरगुती, २७८ व्यावसायिक आणि ५३ औद्योगिक ग्राहकांचा समावेश आहे. दिवसा वीज उपलब्ध होऊन शेतीकामे सुलभ होणार असून, ग्रामीण भागातील वीज पुरवठ्याच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा होणार असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

# घरकुलासाठी मोफत रेती की पावत्यांचा खेळ?

## तलाठी-ग्रामसेवकांवर संशय

प्रतिनिधी २५ मार्च

**उमरखेड :** घरकुल लाभार्थ्यांना बांधकामासाठी शासनाकडून मोफत रेती पुरवठा करण्याची योजना असताना, त्या प्रक्रियेतच गैरप्रकार होत असल्याच्या चर्चा उमरखेड तालुक्यात रंगू लागल्या आहेत. तलाठी व ग्रामसेवकांकडून ट्रॅक्टरधारकांना देण्यात येणाऱ्या रेती पावत्यांमध्ये अनियमितता होत असल्याचे समोर येत आहे.

शासनाच्या नियमानुसार प्रत्येक लाभार्थ्यास ५ ब्रास रेती विना रॉयल्टी देण्यात येते. मात्र प्रत्यक्षात एका पावतीवर अनेक खेपा करण्याची मुभा दिली जात असल्याची चर्चा आहे. काही ठिकाणी पावत्यांवर वेळ नमूद न करता किंवा जास्त वेळ दाखवून वाहनधारकांना सोयीस्कर व्यवहार करण्याची संधी दिली जात असल्याचा आरोप होत आहे.

योजनेचा उद्देश मोफत रेती पुरवठा असला तरी, लाभार्थ्यांकडून वाहतूक खर्चाच्या नावाखाली सुमारे ४ हजार रुपये घेतले जात असल्याचे सांगितले जाते. याशिवाय, पावतीवरील वेळेच्या फेरफारासाठी प्रति ट्रिप ५०० रुपये घेतले जात असल्याच्या चर्चांनी जोर धरला आहे.

विशेष म्हणजे, पूर्वी रेती तस्करीत सक्रिय असलेले काही अनुभवी वाहनधारकच आता या प्रक्रियेत पुढे असून, ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये पावत्या मिळवण्यासाठी गर्दी वाढत असल्याचे चित्र आहे. उशीर झाल्यास 'ट्रॅक्टर अडकले', 'रस्ता बंद होता' अशी कारणे दाखवून पावत्या समायोजित केल्या जात असल्याचेही



बोलले जाते.

या संपूर्ण प्रकरणात तलाठी आणि ग्रामसेवक यांच्या संगनमताचा संशय व्यक्त केला जात असून, मोफत रेती योजनेतून काही जणांकडून आर्थिक फायदा घेतला जात असल्याची चर्चा स्थानिक स्तरावर सुरू आहे. दरम्यान, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार दि. २५ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



# घरकुल योजनेत घोटाळा, गोरगरिबांच्या अनुदानावर भ्रष्टाचाऱ्यांचा डोळा !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील घरकुल योजनांमधील, रमाई, शबरी, प्रधानमंत्री आवास योजना आदी गोरगरिबांसाठी राबविण्यात येत असलेल्या योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरप्रकार होत असल्याची चर्चा जिल्हाभर होत आहे. या गंभीर प्रकरणात बोगस लाभार्थी, लाचखोरी आणि अनधिकृत बांधकामे असे भ्रष्टाचाराचे गंभीर प्रकार आता उघडकीस येत आहेत. परिणामी या योजनांमध्ये अपात्र लोकांना घरकुल मिळणे, पंचायत समिती स्तरावर पैशांची मागणी करणे, आणि गोरगरिबांसाठी असलेल्या निधीचा गैरवापर होणे आदी मुद्दे समोर येत असून, असे गंभीर घोटाळे रिसोड व मालेगांव तालुक्यात खुप मोठ्या प्रमाणात झाले असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

प्रधानमंत्री आवास घरकुल योजना टप्पा क्रमांक दोन अनंतर्गत प्रशासनाने पात्र कुटुंबाची सर्व्हेक्षण मोहीम राबवली होती. त्या अनुषंगाने राज्य शासनाच्या ग्राम विकास आणि पंचायत राज विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी आदेश सुद्धा निर्गमित केले आहेत. त्यानुसार सन २०२४- २५ ते २०२८- २९ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी प्रधानमंत्री आवास घरकुल योजना टप्पा क्रमांक दोन राबविला जात आहे. विशेष बाब म्हणजे यापूर्वी जे लाभार्थी पात्र असूनही योजनेच्या लाभापासून वंचित राहिले होते त्यांची निवड व्हावी म्हणून सुधारित सर्व्हेक्षण सुद्धा करण्यात आले आहे. त्यामुळे प्रतीक्षा यादीत वंचित असलेल्यांचा समावेश करण्यात आल्याने पात्र कुटुंबातील लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ घेण्यासाठी मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, प्रधानमंत्री आवास योजना सन २०२४- २५ या वर्षातील लाभार्थ्यांची यादी समोर आली असून, त्यावर नजर टाकल्यास नक्कीच डोळे चक्रावून जातील अशी परिस्थिती आहे. या यादीतील हाऊस स्टेटस कंप्लीटेड हा रकाना आणि मंजूर रक्कम व वितरित रक्कम हे रकाने बारकाईने तपासून पाहिल्यास प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेतील स्वैराचार सहज लक्षात येते. अन्.. त्याहूनही विशेष बाब म्हणजे इन्स्पेक्शन डेटच्या रकान्यावर नजर टाकली तर, सबंधित प्रशासनाच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित होते. ह्या याद्या पडताळून पाहिल्यास ज्यांच्याकडे दोन मजली पक्के घरं आहेत, ज्यांच्याकडे पन्नास एकर शेती आहे असे देखील त्यात लाभार्थी असल्याची गंभीर माहिती समोर येत आहे. परिणामी यादीत पात्र लाभार्थ्यांची नावे तर नक्कीच आहेत, मात्र प्रधानमंत्री आवास योजनेच्या आडून काही मातब्बर अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी स्वतःची घरं भरून घेतली असल्याचे वास्तव सुद्धा तितकंच खरं आहे. याचं कारण ही तितकच साजेशे आहे, पेमेंट प्रक्रियेमध्ये ( इऊध ) म्हणजेच निधी हस्तांतरण आदेश हा या योजनेतील महत्वाचा टप्पा आहे. जो प्रशासकीय अधिकाऱ्यांशिवाय पूर्ण होऊच शकत नाही. त्यामुळे घरकुल योजनांमधील भ्रष्टाचाराचा केंद्रबिंदू हा सबंधित प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आसपासच असल्याचे स्पष्ट होत आहे. परिणामी ही प्रधानमंत्री आवास नव्हे; ' आवारा ' योजना बनली असल्याचे सर्वसामान्य जनता बोलत आहे.



## घरकुल योजनेतील भ्रष्टाचाराची चौकशी व्हायलाच पाहिजे !

प्रधानमंत्री आवास योजनेतील अनेक गैरप्रकार समोर येत असून या योजनेतील मनमानी कारभारावर कारवाई झालीच पाहिजे, अन्यथा पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणे मुश्किल होईल असे गोरगरीब जनता बोलत आहे. तसेच या भ्रष्टाचारात महा - ऑनलाईनवाले व काही स्थानिक लोकप्रतिनिधीही आपली डाळ शिजवून घेत असल्याचा आरोप केला जात आहे. रिसोड व मालेगांव तालुक्यात बोगस लाभार्थ्यांची संख्या लक्षणीय असून आत्तापर्यंत या योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांची जर कसून चौकशी केली तर त्यात निम्म्यापेक्षा अधिक लाभार्थी या योजनेसाठी पात्र नसल्याचे आढळून येईल. त्यामुळे या भ्रष्टाचाराची चौकशी होणे गरजेचे आहे. ' रिसोड तालुक्यात घरकुलांचे हप्ते पंचायत समिती स्तरावरील अधिकारी आणि सबंधित अभियंते हे लाभार्थ्यांसोबत संगनमत करतात व परस्पर वितरण करतात. या प्रक्रियेत सरपंचांना कुठल्याही प्रकारे विश्वासात घेतले जात नाही. घरकुल मंजूर झाल्यानंतर जो प्रस्ताव दाखल करण्यात येतो, त्यावर सरपंचाची स्वाक्षरी न घेता पंचायत समिती स्तरावरील दलाल व अभियंता परस्पर काम करतात आणि अधिकारी त्यांना पाठबळ देतात. त्यामुळे या भ्रष्टाचारात सरपंचाचा काहीही संबंध नाही. त्यांना विनाकारण बदनाम करू नये अशी अपेक्षा आहे.

**श्री. बळीराम बोडखे** सरपंच संघटना तालुका अध्यक्ष


सुपरफास्ट
सोमवार दि. २३ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

दहा हजार द्या, घरकुल अनुदान घ्या !

*घरकुल लाभार्थ्यांची आर्थिक पिळवणूक *भ्रष्टाचारात रिसोड तालुका अव्वलस्थानी

भ्रष्टाचार रोखण्याचे जिल्हा प्रशासनापुढे आवाहन

---

## थोडक्यात

### मंजुश्री काळेचे नवोदय परीक्षेत यश

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●



भटउमरा येथील शेतकऱ्याची मुलगी असलेल्या मंजुश्री नारायण काळे या विध्यार्थीनीने नवोदय विद्यालयाकडून इयत्ता सहावी-साठी घेतलेल्या प्रवेश परीक्षेत ९६.२५ टक्के गुण मिळवून यश संपादन केले. मंजुश्री काळे ही साखरा येथील अटल बिहारी वाजपेयी जिल्हा परिषद शाळेची विध्यार्थीनी असून शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि प्रचंड नेहनतीच्या जोरावर तिने हे यश मिळवले.मंजुश्रीच्या यशाबद्दल तिचे सर्व स्तरावरून कौतुक केले जात असून भविष्यात भारतीय प्रशासकीय सेवेत जाऊन देशाची सेवा करण्याची तिची इच्छा आहे.

### एमएच वुमेन एक्सलेन्स पुरस्काराने सिंधुताई तुपकर सन्मानित !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

युनाय फाऊंडेशन आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित महाराष्ट्रातील कर्तुत्ववान महिलांचा गौरव सोहळा शनिवार दि २१ मार्च रोजी अण्णाभाऊ साठे सभागृह बिबवेवाडी,पुणे येथे उत्साहात संपन्न झाला. उद्घाटक मा.मंजुषाताई दीपकभाऊ नागापुरे महापौर,पुणे ह्या होत्या. प्रमुख पाहुणे मा. मायाश्री गायकवाड संयोजक युनाय फाऊंडेशन, प्रमुख वक्ते ॲड. मा. अदिती निटुरे पब्लिक स्पिकर, मा. गौरी निरगुडकर, विमेन लीडरशीप प्रोग्राम हेड, मा. बरखा लाहोटी संस्थापक सचिव, मा. शिल्पा खिवंसरा उपाध्यक्षा उपस्थित होत्या. विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा गौरव या वेळी करण्यात आला. माध्यम आणि संवाद क्षेत्रात येथील रहिवासी सुत्रसंचालीका सिंधुताई मदन तुपकर यांचा महावस्त्र,सन्मानपत्र,सन्मान चिन्ह मा. जयश्री भुमकर यांच्या हस्ते एमएच एक्सलेन्स वुमेन २०२६ हा पुरस्कार देवून गौरविण्यात आले.




शिवाय जिजाऊ जन्मोत्सव सोहळा , अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, खासदार राहुल गांधी,मा.शरदचंद्र पवार, मुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या राजकीय सभांचे सुत्रसंचलन करण्याचा दीर्घ अनुभव आहे.हजरजबाबीपणा समय सुचकता आणि प्रसंगावधान मार्गदर्शनातून आत्मविश्वास पेरण्याचे काम जिद्दीने त्या करीत आहे.सत्यता आणि स्पष्टता मांडण्याचे हे माध्यम आहे. ताईंना मिळालेल्या पुरस्काराबद्दल सर्वच स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

---

# चिमुकल्यांच्या पाठीवरील दप्तरांचे ओझे कमी करा - अमोल गाभणे

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शालेय विद्यार्थ्यांच्या पाठीवर लादल्या जाणाऱ्या दप्तरांच्या वाढत्या ओझ्याविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्रमक भूमिका घेत शिक्षण विभागाला थेट इशारा दिला आहे. लहानग्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ सुरू असून, शिक्षणाचे साधन असलेले दप्तरच आता विद्यार्थ्यांसाठी शिक्षा बनत असल्याचा गंभीर आरोप मनसेने केला आहे. याबाबत मंगळवार, २४ मार्च रोजी विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांच्या आदेशानुसार तसेच मनसे नेते राजू उंबरकर, संपर्कप्रमुख बाबू वागस्कर आणि मनविसे प्रमुख संघटक चेतन पेडणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा सचिव अमोल गाभणे यांच्या नेतृत्वात शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद यांना निवेदन देण्यात आले.



निवेदनात नमूद आहे की, राज्यातील हजारो विद्यार्थी अक्षरशः दप्तरांच्या ओझ्याखाली दबले जात आहेत. पुस्तके, वह्या, प्रोजेक्ट साहित्य यांचा अनावश्यक भार लादल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर परिणाम होत आहे. मात्र, याकडे प्रशासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केल्याने संताप व्यक्त होत आहे. मनसेने या प्रश्नावर ठोस भूमिका घेत दप्तराचे ओझे तात्काळ कमी करण्याची मागणी केली आहे. इयत्तेनुसार दप्तराचे वजन मर्यादित करणे, सर्व शाळांमध्ये लॉकर व्यवस्था सुरू करणे, डिजिटल शिक्षण व ई-बुक्सचा वापर वाढवणे, तसेच आठवड्याच्या नियोजनानुसारच मर्यादित पुस्तके आणण्याचा नियम लागू करणे अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. यासोबतच संयुक्त पुस्तके व वह्यांची प्रणाली राबवावी आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शाळांवर कठोर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, नवीन शैक्षणिक सत्र सुरू होण्यापूर्वीच या मागण्यांवर ठोस निर्णय न घेतल्यास राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही मनसेने दिला आहे. शाळांसमोर निदर्शने, शिक्षण विभागाच्या कार्यालयांवर मोर्चे आणि आवश्यकतेनुसार रस्त्यावर उतरून जनआंदोलन करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर आता शिक्षण विभाग याबाबत कितपत गंभीर पावले उचलतो, याकडे पालक व विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे. यावेळी निवेदन देतांना यावेळी मनसेचे माजी जिल्हाध्यक्ष मनीष डांगे, शहराध्यक्ष रवि वानखेडे, फकीरा कर्डिले, शाहरुख मांजरे, चेतन इंगोले, संदीप वानखेडे, गणेश इंगोले, अमोल वानखेडे, संतोष गवळी, गंगाराम खंदारे, जुम्मा बेनीवाले, गणेश खुणारे, संतोष होणारे, सागर न्याती इत्यादी उपस्थित होते.



---

## मागील १५ दिवसांपासून फळबाग योजनेवर बातम्यांची मालिका; कागदपत्रांच्या स्त्रोतावर संशय

● सिटी न्युज ब्युरो @ शेलुबाजार ●

तालुक्यात कृषी विभागातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (माग्रारोहयो) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या फळबाग योजनेविषयी मागील १५ दिवसांपासून काही माध्यमांतून सतत बातम्यांची मालिका प्रसारित होत असल्याने चर्चेला उधाण आले आहे. या बातम्यांमध्ये विविध कागदपत्रे, आकडेवारी आणि तपशील सादर करण्यात येत असून, ही माहिती नेमकी कुठून मिळाली याबाबत आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

संबंधित बातम्यांमध्ये शासकीय नोंदींमधील तपशीलवार माहिती दाखवली जात असल्याने, ही कागदपत्रे अधिकृत मार्गाने मिळवली की अन्य कोणत्या मार्गाने याबाबत संशय व्यक्त केला जात आहे. काही ठिकाणी तर शासकीय कार्यालयातील कागदपत्रांची चोरी झाली असावी का? असा सवालही शेतकऱ्यांमध्ये उपस्थित केला जात आहे.दरम्यान, कृषी विभागातील अधिकाऱ्यांकडून या प्रकरणाबाबत



अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट करण्यात आलेली नाही. मात्र, कार्यालयीन नोंदींची सुरक्षितता आणि गोपनीयता राखण्याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. स्थानिक शेतकरी व नागरिकांमध्ये याबाबत विविध चर्चा सुरू असून, जर शासकीय कागदपत्रांचा गैरवापर किंवा चोरी झाली असेल तर संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. तसेच, जर माहिती कायदेशीर मार्गाने मिळवण्यात आली असेल, तर त्याबाबत पारदर्शकता ठेवावी, अशीही अपेक्षा व्यक्त केली जात आहे.या प्रकरणाची सखोल चौकशी करून सत्य समोर आणण्याची गरज व्यक्त होत आहे.

---

# एसडीपीओची जुगार अड्डयावर कारवाई !

## १८ जणांविरुद्ध गुन्हे दाखल, ७.७५ लाखांचा मुद्देमाल जप्त

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

अकोला रोडवरील सिद्धू पाटील ढाब्यावर पोलिसांनी टाकलेल्या धाडीत जुगार खेळणाऱ्या आरोपींवर मोठी कारवाई करण्यात आली. या कारवाईत लाखोंचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून याप्रकरणी १८ जणांवर विविध कलमान्वये वाशिम ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले आहे.वाशीमचे एसडीपीओ नवदीप अग्रवाल आणि त्यांच्या पथकाने थेट ही कारवाई केल्याने अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये एकच खळबळ आहे.

उपविभागीय पोलीस कार्यालय वाशिम तसेच पोलीस स्टेशन वाशिम ग्रामीणच्या पथकाने काल दि २४ मार्च रोजी सकाळी सिद्धू पाटील या धाब्यावर छापा टाकला. यावेळी ४ आरोपी पैसे लावून पत्त्यांवर जुगार खेळताना रंगेहात आढळून आले. पोलिसांना पाहताच इतर काही आरोपी घटनास्थळावरून फरार झाले. या प्रकरणी एकूण १८ आरोपींची नावे निष्पन्न करण्यात आली असून त्यांच्या विरोधात वाशिम ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाईदरम्यान आरोपींकडून रोख रक्कम ३२,६०० रुपये, जुगार साहित्य,



### यांच्यावर झाले गुन्हे दाखल

१ )नाझीम खा पठाण २ ) गणेश हेंद्रे ३ ) सिध्देश्वर लोनसुने ४ )गजानन चौधरी ५ )शेख खाजा ६ ) देवीदास वानखेडे ७) लक्ष्मण ८ ) शेख इकबाल ९ )दत्ता लठाड १० ) युवराज फॅन्सी बॅग्लर्स वाला ११ ) शेख अशपाक १२ ) शामा सुरवसे १३ ) समशेर खॉ पठाण १४)सोनु खॉ १५ ) मुजाहिद खॉ १६ ) शेख जावेद १७ ) जॉन १८ ) अददू सर्व रा.वाशीम यांच्यावर वाशीम ग्रामीण पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल करण्यात आले.

मोबाईल फोन आणि मोटारसायकल असा एकूण सुमारे ७,७५,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दरम्यान, घटनास्थळाची पाहणी करताना त्या ठिकाणी अवैध दारू विक्री होत असल्याचा संशय पोलिसांना आला. याबाबत राज्य उत्पादन शुल्क विभागाला माहिती देण्यात आली. त्यानंतर उत्पादन शुल्क विभागाने देशी-विदेशी दारूचा सुमारे २७,१२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून संबंधितांवर कारवाई केली.ही संयुक्त कारवाई पोलीस अधीक्षक अनुज तारे, अप्पर पोलीस अधीक्षक लता फड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल, तसेच पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आणि वाशिम राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने केली.

### पिस्टल काढल्याची चर्चा पूर्णतः खोटी; प्रत्यक्षात फक्त धक्का-बुक्की

या ढाब्यावर सुरू असलेल्या जुगार कारवाईपूर्वी दोन व्यक्तींमध्ये जुन्या वादातून पुन्हा एकदा वाद निर्माण होऊन धक्का-बुक्की झाल्याची घटना घडली. या घटनेचा राग मनात धरून संबंधित व्यक्तीने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना फोन करून स्वतःवर मारहाण झाल्याचा, पैसे हिसकावल्याचा तसेच पिस्टल दाखवून धमकावल्याचा आरोप केला . या माहितीची गंभीर दखल घेत वरिष्ठ पोलीस अधिकारी तात्काळ आपल्या पथकासह घटनास्थळी दाखल झाले. मात्र, घटनास्थळी उपस्थित प्रत्यक्षदर्शकांनी दिलेल्या माहितीनुसार पिस्टलची काढल्याची अशी कोणतीही घटना घडली नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे पिस्टल काढल्याची चर्चा पूर्णतः खोटी असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून समोर आली आहे. तथापि, संबंधित व्यक्तीने केलेल्या गंभीर आरोपांमागील नेमके सत्य काय, याचा सखोल तपास पोलिसांकडून सुरू आहे.

---

# ध्येय निश्चित केल्यास यश हमखास-आकाश वर्मा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

ग्रंथसंस्कृतीला चालना देत विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित ग्रंथोत्सव २०२५ च्या दुसऱ्या दिवशी परिसंवाद सत्रास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या सत्रात कारंजाचे उपविभागीय अधिकारी आकाश वर्मा (भा.प्र.से.) यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना यशस्वी वाटचालीसाठी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. ध्येय निश्चित केल्यास यश हमखास मिळते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.





महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय व जिल्हा ग्रंथ अधिकारी कार्यालय वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या या ग्रंथोत्सवातील परिसंवादाचा विषय स्पर्धा परीक्षेला सामोरे जाताना असा होता. आपल्या भाषणात आकाश वर्मा यांनी एमपीएससी व यूपीएससी परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी यशस्वी होण्याची पाच मूलभूत तत्त्वे अधोरेखित केली.

आपले ध्येय स्पष्ट आणि ठाम असेल, तर यश हमखास मिळते, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना उद्दिष्ट निर्धारणाचे महत्त्व पटवून दिले. अभ्यास करताना सातत्य राखणे, प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र वेळ देणे, सूक्ष्म नियोजन करणे आणि थकवा आल्यास विषय बदलून अभ्यास करणे या गोष्टींचा अवलंब करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, स्पर्धा परीक्षेची तयारी करताना प्लॅन 'बी' तयार ठेवणे गरजेचे असून त्यामुळे अपयश आल्यासही मनोबल खचत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी मानोरा येथील तहसीलदार तृप्ती खैरनार यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, एमपीएससी आणि यूपीएससी या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून आजच्या घडीला त्यामधील फरक कमी झाला आहे, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी कोणतीही दिशा निवडताना ती विचारपूर्वक आणि ध्येय निश्चित ठेवून निवडावी, असे त्यांनी आवर्जून सांगितले. पदवी शिक्षणासोबतच राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास या विषयांवर अधिक भर देण्याचे त्यांनी सुचविले. सोशल मीडियाचा अतिरेक टाळून अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहनही त्यांनी केले.परिसंवादात जिल्हा कोषागार अधिकारी विजय जवंजाळ तसेच स्पर्धा परीक्षा वार्ता चे संपादक दिगंबर इंगळे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपल्या अनुभवातून उपयुक्त सूचना दिल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गजानन वाघ यांनी प्रभावीपणे केले. या परिसंवादानंतर जिल्हा परिषद शाळा, मोहजा रोड येथील विद्यार्थ्यांनी सादर केलेली 'शिदोरी' ही नाटिका विशेष आकर्षण ठरली. ग्रामीण स्त्रीचे जीवन वास्तवदर्शी पद्धतीने मांडणाऱ्या या सादरीकरणाने उपस्थितांना भावूक करत टाळ्यांचा कडकडाट मिळवला. एकूणच, या परिसंवादातून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी स्पष्ट दिशा मिळाल्याचे चित्र दिसून आले.

---

## चोर आंबा रस्त्यावरील जीवघेणे खड्डे अखेरीस बुजवले !



● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

शेतकरी तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला चोर आंबा परिसरातील रस्ता गेल्या काही काळापासून अत्यंत खड्डेमय झाला होता.या रस्त्याची अवस्था इतकी बिकट झाली होती की,तो अपघातांचे केंद्रबिंदू बनला होता.त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीती आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते.

या धोकादायक रस्त्यामुळे अनेक अपघातही घडले होते.यापूर्वी शेतमाल वाहतूक करणारा ट्रॅक्टर पलटी झाल्याची घटना तसेच एका दुचाकीचा सुद्धा अपघात झाला होता.या सलग घटनांमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली होती आणि तात्काळ उपाययोजनांची मागणी जोर धरू लागली होती. या पार्श्वभूमीवर समाजसेवक विनोद राऊत आणि त्यांच्या मित्रपरिवाराने पुढाकार घेत संबंधित प्रशासनाकडे वारंवार निवेदने सादर केली.तसेच सातत्याने पाठपुरावा करून या प्रश्नाची तीव्रता प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली.त्यांच्या या प्रयत्नांना यश मिळत,नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्या त्वरित समन्वयामुळे अनेक दिवसांपासून रखडलेले रस्त्याचे काम अखेर आज सुरू करण्यात आले आहे.त्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.तसेच या आंदोलनाला सहकार्य करणाऱ्या कारंज्यातील पत्रकार बांधवांचेही मनापासून आभार मानले आहे.प्रशासनाने दाखवलेली तत्परता देखील कौतुकास्पद असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत असून,भविष्यातही अशाच प्रकारे लोकहिताच्या प्रश्नांवर वेगाने कार्यवाही व्हावी,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
बुधवार, दि. २५ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



# गुरुवारी शहरात मोठ्या उत्साहात निघणार श्रीराम जी की सवारी

प्रतिनिधी २५ मार्च





**अकोला :** शहरात विश्व हिंदू परिषद- श्रीराम नवमी शोभायात्रा समिती तसेच विविध संस्था व संघटना यांच्या वतीने गुरुवार २६ मार्चला श्रीराम नवमी निमित्त भव्य शोभायात्रा काढली जाईल. यामध्ये प्रभू श्रीराम सीता लक्ष्मण हनुमान यांचे सजीव देखावे, लेझीम व वाद्यपथके ढोल ताशे यांचे विशेष आकर्षण राहणार आहे. शहरातील टिळक मार्गावरील मोठ्या राम मंदिरासह बिर्ला राम मंदिर गांधी रोडवरील लहान राम मंदिर, तसेच अन्य राम मंदिरांमध्ये जन्मोत्सव कीर्तन व इतर कार्यक्रम होणार आहेत. विश्व हिंदू परिषद श्रीराम नवमी शोभायात्रा समितीच्या वतीने सायंकाळी पाच वाजता श्री राजेश्वर मंदिर परिसरातून शोभा यात्रेला सुरुवात होईल. श्री राज राजेश्वर मंदिर ते सिटी कोतवाली पुढे टिळक रोड जुना कपडा बाजार जैन मंदिर गांधी चौक गांधी मार्ग होऊन परत शोभायात्रा सिटी कोतवाली मागील रस्त्याने राणी सती धाम मंदिर येथे पोहोचेल ठिकाणी शोभा यात्रेची समाप्ती केली जाईल शोभायात्रेत साठ मंडळांचा सहभाग राहील यामध्ये प्रभू श्रीराम सीता लक्ष्मण यांचे सजीव देखावे १५ फूट उंचीची हनुमानाची मूर्ती, वारकरी मंडळ, लाठीकाठी चे प्रात्यक्षिक लेझीम पथकाचे सादरीकरण, ढोल ताशे व ढोल पथक यांचे विशेष आकर्षण राहणार आहे. या शोभायात्रेत मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून या शोभा यात्रेची प्रतिष्ठा यंदा सुद्धा कायम राखण्याचे आवाहन विश्व हिंदू परिषद श्रीराम नवमी शोभायात्रा समितीतर्फे करण्यात आले आहे मागील वर्षी पेक्षा सुद्धा यंदाची रामनवमी शोभायात्रा सर्वांच्या डोळ्याचे पारणे फेडणारी राहील अशी अपेक्षा वर्तवली जात आहे. या शोभा यात्रेचे जागोजागी विविध सामाजिक संघटना तर्फे जोरदार स्वागत केले जाईल तसेच शोभायात्रेत शामिल सर्वांना ठिकठिकाणी चहा, नाश्ता, शितपेय, तसेच महाप्रसाद व थंड पाण्याचे वितरण केले जाईल.



## जिवंत देखावे, लेझीम, वाद्यपथकांचे राहणार आकर्षण

### श्रीराम उत्सव समितीतर्फे राम जन्मोत्सव व महाआरतीचे आयोजन

दरवर्षीप्रमाणे यंदाही शहरातील गांधी चौकात श्रीराम उत्सव समितीतर्फे प्रभू श्री रामचंद्र दरबारची स्थापना करण्यात आली आहे २२ मार्चपासून या ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे याचा मोठ्या संख्येने नागरिकांनी लाभ घेतला सायंकाळी या ठिकाणी महाटीचे आयोजन केले जाईल या कार्यक्रमात राम भक्तांनी मोठ्या संख्येने आपली उपस्थिती दर्शवावी असे आवाहन श्रीराम उत्सव समितीतर्फे करण्यात आले आहे

### मोठ्या राम मंदिरात श्रीराम जन्मोत्सवाची तयारी पूर्ण

श्रीराम नवमी जन्मोत्सवाचा मुख्य सोहळा टिळक मार्गावरील श्री संत गजानन महाराजांच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेल्या मोठ्या राम मंदिरात होणार आहे. श्रीराम नवमी निमित्त सकाळी सात वाजेपासून विविध कार्यक्रम नंतर दुपारी बारा वाजता मोठ्या भक्ती भावात राम जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे रामनवमीनिमित्त श्रीराम मंदिराला अत्यंत सुंदर रित्या सजविण्यात आले आहे रामनवमीला या ठिकाणी मोठी यात्रा भरते पहाटेपासून ते उशिरा रात्रीपर्यंत रामनवमीला येथे दर्शन घेणाऱ्यांची मोठी गर्दी उसळते श्रीराम जन्मोत्सवाचा सर्वांगी लाभ घेण्याचे आवाहन श्री राम व हरिहर संस्थांनच्या वतीने करण्यात आले आहे

### सार्वजनिक श्रीराम जन्मोत्सव समितीच्या वतीने गुरुवारी भव्य रॅली

सार्वजनिक श्रीराम जन्मोत्सव समितीच्या वतीने २६ मार्च रोजी भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे सकाळी दहा वाजता शहराचे आराध्य दैवत श्री राजेश्वर मंदिर येथून ही रॅली प्रारंभ होणार असून शहरातील प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करणार आहे रॅलीचे मुख्य आकर्षण म्हणून श्रीराम लक्ष्मण व सीतामाता यांच्या प्रेक्षणीय झाकी सादर करण्यात येणार आहे

# श्री राम चौकात रामनवमीला महाआरती

प्रतिनिधी २५ मार्च

## ♦ दुपार पासून मध्य रात्री पर्यंत महाप्रसाद वितरण



**अकोला :** प्रभू श्रीराम जन्मोत्सवानिमित्त बिर्ला गेट नंबर २ येथे 'जय श्री राम मित्र मंडळा' तर्फे भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गुरूवार, २६ रोजी रामनवमीला दुपारी १२ वाजता महाआरती होईल. महाआरतीला हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

महाआरती यंदाच्या सोहळ्याचे आकर्षण राहणार आहे. दुपारी १२:२१ पासून ते रात्री १२:२१ वाजेपर्यंत महाप्रसाद वितरण करण्यात येईल. तसेच पर्यावरणाची कास आणि भक्तीची जोड म्हणून ११,००० तुळशी रोपांचे मोफत वाटप करण्यात येईल. श्री राम चौकातील देवदेवता आणि महापुरुषांच्या देखाव्यांनी अतिशय देखणे वातावरण तयार झाले आहे. हजारो भाविक दररोज दर्शन घेत आहेत. भाविकांची मांदियाळी याठिकाणी दिसते. येथील सजावट, रोषणाई शहरात चर्चेचा विषय झाला आहे. या पवित्र प्रसंगी सर्वांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा आणि आपल्या उपस्थितीने हिंदू एकतेचे दर्शन घडवावे असे आवाहन जय श्री राम मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# सामाजिक न्याय योजनांचे छायाचित्र प्रदर्शन आजपासून

प्रतिनिधी २५ मार्च

**अकोला :** जिल्हा माहिती कार्यालय व सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालयाच्या सहकार्याने २५ ते २७ मार्च या कालावधीत सामाजिक न्याय योजनांचे प्रदर्शन उपविभागीय कार्यालय (तहसील) येथे सुरू होईल.

शासनाकडून अनुसूचित जातींसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रदर्शनाचा शुभारंभ दु. १२.३० वा. मान्यवरांच्या उपस्थितीत होईल. छायाचित्र प्रदर्शनामध्ये सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांची माहिती छायाचित्रे, माहिती फलक व दृकश्राव्य माध्यमांच्या साहाय्याने सादर करण्यात येणार आहे. अनुसूचित जातीतील लाभार्थ्यांसाठी शिक्षण, स्वयंरोजगार, निवास व आर्थिक सहाय्य योजनांविषयी मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नागरिक, अधिकारी व कर्मचारी, शालेय विद्यार्थ्यांनी छायाचित्र प्रदर्शनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा माहिती कार्यालयातर्फे करण्यात आले आहे.

# रेल्वे स्टेशन चौकात मनपा झोन कार्यालयामागे आग

## अज्ञात व्यक्तीने आग लावल्याचा संशय


प्रतिनिधी २५ मार्च



**अकोला :** रेल्वे स्टेशन चौक परिसरात मनपा झोन कार्यालयाच्या मागील भागात अज्ञात व्यक्तीने आग लावल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले असून प्रशासनाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली आहे. रेल्वे स्टेशन चौकातील मनपा झोन कार्यालयाच्या मागील बाजूस अचानक आग लागल्याची घटना उघडकीस आली आहे. प्राथमिक माहितीनुसार, ही आग अज्ञात व्यक्तीकडून जाणूनबुजून लावण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. घटना लक्षात येताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ प्रशासनाला माहिती दिली. त्यानंतर अग्निशमन दल व संबंधित यंत्रणा घटनास्थळी दाखल होऊन आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती समोर आलेली नाही. दरम्यान, या प्रकरणाची गंभीर दखल घेत प्रशासनाने तपास सुरू केला असून आग लावणाऱ्या अज्ञात व्यक्तीचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास अधिक गतीने केला जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.






























आर आर सी नेटवर्कचे कार्यकारी संचालक पंकज देशमुख यांचा वाढदिवस आर आर सी कार्यालयात अतिशय उत्साहाने साजरा करण्यात आला. आर आर सी परिवार तसेच शहरातील मान्यवरांनी पंकज देशमुख यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK